
# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०२३
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष तेविसावे
अंक चौथा



# पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

## 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**२०,०००/-**



पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक चौथा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **एक एक पान घडताना...** | **८** |
| **विशेष लेख** | **१०** |
| **पुरस्कार** | **२२** |
| **श्रद्धांजली** | **२३** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| शल् वी टेल द प्रेसिडेंट? | २४ |
| ड्रीम्स ऑफ जॉय | ३० |
| लोकमान्य टिळक दर्शन | ३६ |
| संजीवन | ४६ |
| **अभिप्राय** | **५६** |
| **दिनविशेष** | **६२** |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

सं

पा

द

की

य

## शेक्सपिअरचे गारूड

वसंतऋतूचं आगमन होऊन पानगळ झालेल्या झाडांना नवपालवी फुटली. उजाड असं वाटणारं निसर्गाचं वातावरण नवपल्लवांनी, नव्या उमेदीने बहरताना पाहायला मिळतंय. नुकतंच चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडव्याला मराठी नववर्ष सुरू झालं. आमच्या सर्व वाचकांना मराठी नववर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

एप्रिल महिन्यात पुस्तकप्रेमींच्या विशेष आवडीचा एक दिवस असतो. तो म्हणजे 'जागतिक पुस्तक दिन.' इंग्रजी साहित्यातील प्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्सपिअर यांची जयंती व पुण्यतिथी असलेला योग. रूढार्थाने बोलायचं झालं तर शेक्सपिअर ४५९ वर्षांचा होतोय. आजही तो आपल्यात साहित्याच्या माध्यमातून आपली साथ करताना पाहायला मिळतो. जवळपास चार शतके शेक्सपिअर नावाचं गारूड जगभरातील साहित्यप्रेमींच्या मनावर राज्य करत असलेलं पाहायला मिळतं.

शेक्सपिअरने इंग्रजी साहित्यात नाट्यलेखन व काव्यलेखन केलं. त्याने लिहिलेल्या नाटकांची भुरळ रसिकांवर इतकी होती की त्यामुळे त्याला 'फादर ऑफ ड्रामा' असंही म्हटलं जातं. जगभरातील सर्व प्रमुख भाषांमध्ये शेक्सपिअरच्या नाटकांची भाषांतरं झालेली आपल्याला पाहायला मिळतात. गेली चार शतके रंगभूमीवरही या नाटकांचे अनेक प्रयोग झालेले




आहेत व आजही होत आहेत.

शेक्सपिअर या व्यक्तीचं व त्याच्या साहित्याचं लोकांच्या मनावर असलेलं गारूड इतकं होतं की त्याच्या नाटकांवरून आधारलेले चित्रपट हिंदीमध्ये प्रदर्शित झालेले आहेत. संजीव कुमार यांची मुख्य भूमिका असणारा व गुलजार दिग्दर्शित 'अंगूर' हा हिंदी चित्रपट, तसेच 'मक्बूल' व 'ओमकारा' हेही चित्रपट नाटकांवरून बेतलेले असल्याचं पाहायला मिळतं.

शेक्सपिअरच्या भाषाशैलीची व लिखाणाची भुरळ मराठी लेखकांवरसुद्धा खूप मोठ्या प्रमाणात असलेली पाहायला मिळते. मराठीतील अनेक नाटककारांनी शेक्सपिअरच्या नाटकांची भाषांतरे व रूपांतरे करून शेक्सपिअर मराठीत वाचकांपर्यंत पोहोचवून मोठं काम केलेलं आपण पाहतो. मराठीतील प्रा. वा. शि. आपटे, गोविंद बल्लाळ देवल, वि. वा. शिरवाडकर, विंदा करंदीकर ही त्यातील प्रतिष्ठित नावं.

शेक्सपिअरची जयंती व पुण्यतिथीही एकाच दिवशी असते. तोच दिवस संपूर्ण जगभर 'जागतिक ग्रंथ दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने पुस्तकप्रेमी शेक्सपिअरच्या स्मृतींना उजाळा देतात. नाटकांचे प्रयोग होताना त्या अनुषंगाने शेक्सपिअरच्या आठवणींचा जागर केलेला पाहायला मिळतो. शेक्सपिअर व त्याचे साहित्य हे जागतिक साहित्यातील एक महत्त्वाचे अभिजात व वाचकप्रिय साहित्य हे अधोरेखित झालेले यानिमित्ताने पाहायला मिळते.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# ए क ए क पा न घ ड ता ना...



**– *अनिल मेहता***

*मेहता पब्लिशिंग हाऊसच्या विज्ञानविषयक साहित्यात मोलाची भर घालणारे डॉ. बाळ फोंडके. त्यांची आणि अनिल मेहतांची भेट कशी झाली आणि मग ते मेहता पब्लिशिंग हाऊसशी कसे जोडले गेले, याविषयीचा हा लेख.*

## मैत्र सर्जकांशी

## डॉ. बाळ फोंडके

आमच्या प्रकाशनाच्या पुस्तकांचा कक्ष एकदा दिल्लीत वर्ल्ड बुक फेअरमध्ये लागलेला होता. बाळ फोंडके - सहा फूट उंचीचा गोरापान माणूस. एक मराठी वैज्ञानिक. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कम्युनिकेशनचे संचालक. मराठी पुस्तकं बघण्यास तिथे आले होते.

त्यांनी मला विचारलं, ''संस्थेमधील काही पुस्तकं मराठीत प्रकाशित करायची आहेत. ती तुम्ही कराल का?''



मी आनंदाने तयार झालो; कारण मराठीत विज्ञानावर पुस्तकं फार कमी होती. त्या काळात ते दिल्लीत होते. आग्रहाने त्यावेळी त्यांनी आपल्या घरी मला जेवायला नेलं होतं. आमचा चांगला परिचय झाला.

त्यांनी विज्ञानकथा व विज्ञानावरची बरीच माहितीपूर्ण पुस्तकं लिहिली. विज्ञान नवलाईवर

त्यांनी लिहिलेला सहा पुस्तकांचा विशेष संच आम्ही प्रकाशित केला. त्यात रॉकेट, यानाचं अंतराळातलं भ्रमण कसं होतं?, पृथ्वीच्या आत- बाहेर नक्की काय आहे?, जमीन, समुद्र, आकाश कुठपर्यंत पसरलं आहे?, पशू, पक्षी कसे आणि कुठून आले?, ते जगतात कसे?, प्राण्यांचं विश्व आपल्याला कधीतरी दिसेल का?, सुरुवातीला आपण कुठून आलो?, आपण कसे होतो?, त्या वेळी आपली भाषा, संस्कृती, रीतिरिवाज कसे होते? या आगळ्यावेगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतात.

आज ते मोठे लेखक आहेत. 'खिडकीलाही डोळे असतात,' 'व्हर्च्युअल रिॲलिटी,' 'ग्यानबाचं विज्ञान,' 'गोलमाल,' 'विज्ञान प्रपंच,' 'दृष्टिभ्रम,' 'सुगरणीचं विज्ञान' ही पुस्तकं खरोखरच वाचनीय झाली आहेत. त्यांना नेहमीच मागणी असते.

टाइम्स ऑफ इंडिया संस्थेच्या 'सायन्स टुडे' या मासिकाचे ते संपादक होते. त्यांनी अनेक लेखकांना विज्ञानावर लिहिण्यासाठी प्रवृत्त केलं व ते लेखन सायन्स टुडेमध्ये छापलं. त्यांनी स्वतः खूप लेखन केलं. ते लेखन त्यांनी अनेक प्रकाशकांना प्रकाशित करण्यासाठी दिलं. विशेष म्हणजे त्यांचं विज्ञानावरील लेखन मुलांइतकंच मोठ्यांनाही वाचायला आवडतं. ते रंजक आहे.

डॉ. बाळ फोंडके मूळ कोकणातले. त्यामुळे केव्हातरी त्यांच्या गावी जाता-येता ते कोल्हापुरात थांबत. नंतर कमलाबाई ओगले यांची नात त्यांची सून झाली. त्यामुळे त्यांचा व माझा परिचय अगदी घट्ट झाला. मी स्वत:ला सुदैवी समजतो की त्यांचा व माझा परिचय झाला, त्यामुळे मी विज्ञानावरील उत्तमोत्तम पुस्तकांची निर्मिती करू शकलो.

◆

वि

शे

ष

ले

ख

## मी अनुभवलेले 'दादा'

*रणजित देसाईंचा (दादांचा) सहवास ज्या भाग्यवंतांना लाभला, त्यापैकी एक आहेत सुप्रसिद्ध विज्ञानलेखक निरंजन घाटे. दादांच्या जन्मदिनाचं आणि स्मृतिदिनाचं औचित्य साधून घाटे सरांनी जागवलेल्या त्यांच्या स्मृती...*

रणजित देसाई यांची आणि माझी ओळख मी सांगली आकाशवाणी केंद्रात असताना झाली. त्यावेळी दादा कोल्हापूरच्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष झाले होते. त्यांची आकाशवाणीसाठी मुलाखत आणि त्यांचं अध्यक्षीय भाषण यांचं ध्वनिमुद्रण करून ते पुणे केंद्राकडे पाठवायचं होतं. आठही मराठी केंद्रांवरून ते सहक्षेपित होणार होतं. मी कोल्हापूरच्या 'अजब पुस्तकालया'त अनिल मेहतांना फोन लावला. माझी आणि रणजित देसाईंची ओळख नव्हती. मेहतांनी त्यांची पुस्तकं काढायला तेव्हा नुकतीच सुरुवात केली होती.

अनिल मेहतांनी 'उद्या कळवतो' असं सांगितलं. त्याप्रमाणे अनिल मेहतांनी तारीख आणि वेळ निश्चित करून मला कळवलं. आता तो बंगला कुणाचा हे आठवत नाही; पण एका बंगल्यात ते ध्वनिमुद्रण झालं. नाट्य संमेलनाच्या उद्घाटनात नीट ध्वनिमुद्रण होणार नाही, असं आम्ही दादांना सांगितलं. प्रत्यक्ष कारण वेगळं होतं. दादांचे उच्चार काही वेळा कळायला अवघड जात. ते बरेचदा तोंडातल्या तोंडात बोलत. पानाचा सततचा तोबरा हे त्याचं कारण होतं. काही इतर कारणंही होती. मी त्याबद्दल लिहिणं अप्रस्तुत ठरेल. त्यांच्याशी संबंधित इतरांनी त्याबद्दल लिहिलं आहे. दोन-तीन वेळा ध्वनिमुद्रण केल्यानंतर आम्हाला हवं तसं ध्वनिमुद्रण मिळालं.



रियाझनं 'ओके' केलं म्हणजे प्रश्नच नव्हता. रियाझ शेख सांगली आकाशवाणीवर उद्घोषक (अनाउन्सर) होता; पण त्याचे-माझे संबंध भावाभावासारखे होते. तरीदेखील तो अखेरपर्यंत मला 'साहेब' म्हणत असे. त्याच्या बोटात जादू होती. तो उत्तम चित्रकार होता. त्याने काढलेलं लताबाईंचं पोर्ट्रेट पुणे आकाशवाणी केंद्रात बघायला मिळतं. तो दादांचं पोर्ट्रेट काढणार,असं बोलणंही त्यावेळी झालं होतं. त्याचं पुढे काय झालं हे कळायला मार्ग नाही. त्यानंतर काही दिवसांनी मी आकाशवाणी सोडली आणि महात्मा फुले संग्रहालयाचा उपसंचालक बनलो. रियाझ माझ्याकडे अधूनमधून डोकवायचा. दरम्यान, तो माझ्याप्रमाणेच अधिकारी बनला. मुंबईत रुजू झाला. आमचा संपर्क कमी होत गेला. दादांच्या पोर्ट्रेटबद्दल विचारायचं राहून गेलं ते राहूनच गेलं. गेल्या वर्षी कोरोनानं तो गेला. त्यामुळे आता हे कोडं उलगडणं शक्य नाही.

पुण्यात आलो तेव्हा मेहतांनी नुकतंच पेरूगेट भावे स्कूल जवळ स्थलांतर केलं होतं. बाहेरच्या खोलीत ऑफिस आणि आतल्या खोलीत अनिल राहत. एक दिवस मी तिथे गेलो असताना अनिलनी मला आतल्या खोलीत जायला सांगितलं. आत गेलो तर साक्षात दादा. त्यांनी कॉटवर शेजारीच बसवून घेतलं. आपुलकीनं चौकशी केली. "तू खूप वाचतोस असं अनिल म्हणाला. माझं काही वाचतोस की नाही?"

यावर काय उत्तर देणार?

"स्वामी," मी बोलून गेलो.

"एवढंच?" दादांनी विचारलं.

तेव्हा 'बंद तुटले नाहीत,' ही त्या वर्षी दिवाळी अंकात आलेली गोष्ट मला आठवली.

तेवढ्यात अनिल आत आले.

"दादा, चला. गाडी आलीय."

'स्वामी'ची नवी आवृत्ती आली की अनिल आणि दादा थेऊरला जाऊन तिथल्या गणपतीच्या पायावर एक प्रत ठेवत असत.

"तू चल रे. गप्पा मारत जाऊ." दादांनी आज्ञा दिली.

आम्ही गाडीत बसलो तेव्हा दादांनी मला मागच्या सीटवर त्यांच्या जवळ बसवून घेतलं. आम्ही जाताना गप्पा मारल्या, त्या अर्थातच पुस्तकांबद्दल. नेहमीप्रमाणे सर्व सोपस्कार पार पडले. मग समाधीचं दर्शन घेऊन आम्ही परत

निघालो.

नंतर काही वर्षांनी पुण्यातील पंडितराव कुलकर्णी यांच्या कुलकर्णी ग्रंथागार प्रकाशनाच्या 'मनोरा' मासिकामध्ये 'बंद तुटले नाहीत' या नावाने एक गोष्ट प्रसिद्ध झाली. नाव बदललेलं असलं, तरी ती दादांच्या गोष्टीची शब्द न् शब्द नक्कल होती. 'मनोरा'त काही वर्षं मी पण लिहीत होतो. त्यामुळे ती कथा वाचताच मी ते पंडितरावांना कळवलं. मी नसतं कळवलं तरी काहीच फरक पडला नसता. 'मनोरा'च्या वाचकांच्या पत्राचा पाऊसच 'मनोरा'वर पडला. त्यावर संपादकांनी त्या लेखकाला पत्र लिहून खुलासा मागवला. तो माणूस प्रामाणिक होता. त्याने त्याची चोरी मान्य केली. त्याच्या खुलाशाचा सर्वसाधारण गोषवारा देतो; कारण ही घटना सुमारे पस्तीस वर्षांपूर्वीची असेल. मी माझ्या काही ज्येष्ठ परिचितांना विचारलं. त्यांनीही 'आता नक्की आठवत नाही; पण साधारण तपशील बरोबर आहे,' असं सांगितलं. त्या व्यक्तीनं तिची चूक पहिल्या वाक्यात मान्य केली होती. पुढचा मजकूर असा-

'मी ती कथा वाचली. मला ती खूप आवडली. अशी कथा आपल्या नावावर असायला हवी, असं मला मनापासून वाटू लागलं. मी मधे काही वर्षं जाऊ दिली. मग ती तशीच्या तशी उतरवून काढली. शीर्षक बदललं आणि संपादकांकडे पाठवून दिली.' त्याचा पुढचा मजकूर 'लई भारी' प्रकारात मोडणारा होता. 'मी काय केलंय ते इतरांना कळायला वेळ लागणार नाही. किंबहुना, संपादक स्वतःच माझी चोरी पकडून माझी गोष्ट परत करतील, असं मला वाटत होतं. तसं न होता ही गोष्ट चक्क छापून आली. याचा अर्थ एकतर संपादक स्वतः आलेलं साहित्य वाचत नाहीत किंवा मराठीत इतरत्र काय छापून आलंय याची त्यांना माहिती नसते. हे पत्र संपादक छापतीलच असं मला वाटत नाही.'

पंडितराव कुलकर्णी यांनी त्या माणसाला पत्र लिहून कळवलं, 'हे पत्र पुढील अंकात छापत आहोत. आपल्याला मासिक किंवा कुठलेही नियतकालिक कसे छापले जाते, या गोष्टीची कल्पना नसावी, हे आपल्या पत्रावरून स्पष्ट होते. प्रमुख संपादकाशिवाय इतर अनेक माणसं नियतकालिकांच्या निर्मितीत सहभागी असतात. सर्वच माणसे सर्वच अंक वाचतील, हे शक्य नाही. शिवाय नियतकालिकांकडे दिवाळीत मजकुरांचा पाऊस पडतो. त्यामुळे असे घडू शकते. झालेल्या घटनेबद्दल आम्ही रणजित देसाईंकडे दिलगिरी व्यक्त केली

आहे. आपले पत्र आणि आमचा खुलासा असलेला अंक आपणाकडे रवाना होईल.'

मी दादांबरोबर पाच-सहा वेळा थेऊरला गेलो. प्रत्येक वेळेस ते मला इंग्रजी पुस्तकांची माहिती विचारायचे. खरं तर त्यांच्या बोलण्यातून आणि एकदा कोवाडला गेलो होतो, तेथील गोष्टी बघितल्यावर त्यांच्याकडे इंग्रजी पुस्तकांचा मोठा साठा होता हे मला माहीत होतं. तेव्हा मी त्यांना म्हटलं की, ''दादा, तुमच्याकडे एवढी पुस्तकं आहेत तर मी तुम्हाला इंग्रजी पुस्तकांबद्दल काय सांगणार?''

तेव्हा ते म्हणाले की, ''मी करमणुकीसाठी पुस्तकं वाचतो. त्यामुळे माझ्याकडे फार थोडी अभिजात पुस्तकं आहेत. बाकी सगळी गूढकथा व रहस्यकथांची पुस्तकं आहेत.''

यावरून आणखी एक गंमत आठवली. एकदा मी मेहतांकडे दादांबरोबर गप्पा मारत बसलेलो असताना, मराठीतले एक विज्ञान-कथालेखक तिथे आले. ते माझ्या घरी गेले असता 'मी मेहतांकडे आहे' हे समजल्यावर ते तिकडे आले होते. त्यांनी काउन्टरपाशी माझी चौकशी केली, तेव्हा त्यांना आतल्या खोलीत पाठवण्यात आलं. मी दादांची आणि त्यांची ओळख करून दिली आणि त्यांना सांगितलं की, ''हे मराठीतले मोठे विज्ञानकथाकार आहेत.''

तेव्हा दादा झट्कन बोलून गेले, ''मी काही विज्ञानकथा वाचल्यात. माझ्या रहस्यकथांच्या संग्रहात बऱ्याच आहेत.''

त्या लेखकाचा पडलेला चेहरा ४० वर्षांनंतरही आठवतो.

एकदा थेऊरच्या प्रवासात दादांनी विचारलं, ''नवीन काय वाचतोस?''

त्यावेळेस मी ब्रिटिश ग्रंथालयाचा सदस्य होतो. तिथून नुकतंच घेतलेलं 'गोलॅन्क्झ सागा' नावाचं एक (बहुतेक तीन भागांतील) पुस्तक वाचून पूर्ण केलं होतं. मुद्रण व्यवसायातील गोलॅन्क्झ कुटुंबाने इंग्लंडमधील रेल्वेस्थानकावर पुस्तकविक्रीची दुकानं थाटली होती. त्या काळात रेल्वेप्रवासाला खूप वेळ लागायचा. त्यामुळे बरेच प्रवासी वेळ घालवायला म्हणून एखादं पुस्तक खरेदी करत आणि प्रवासात ते वाचून काढत. जर पुस्तक वाचून झालं असेल आणि त्याच्यावर काही खाणाखुणा नसतील नि पुस्तक चांगल्या स्थितीत असेल, तर नियोजित स्थानकावर उतरल्यावर ते परत स्टॉलवर दिलं की ४०टक्के रक्कम परत मिळत असे. त्यानंतर गोलॅन्क्झ कंपनीने स्वतःचा प्रकाशन व्यवसाय सुरू केला. त्या प्रकाशन व्यवसायाला ५० वर्षं झाल्याबद्दल 'गोलॅन्क्झ सागा' हे

खूप अभ्यासपूर्ण पुस्तक 'व्हिक्टर गोलॅन्क्झ कंपनी'ने प्रसिद्ध केलं.

मी ही हकिकत दादांना सांगितली. ऐकल्यावर ते म्हणाले, ''आपल्याकडेही अशा बऱ्याच घराण्यांवर लिहिता येईल. शाहू महाराजांच्या पहिल्या पेशव्यांपासून ते नानासाहेबांच्या मृत्यूपर्यंत जवळजवळ १००-१५० वर्षांचा इतिहास त्यात मांडता येईल. १८५७ च्या युद्धात नानासाहेब पेशवे परागंदा होईपर्यंत एवढा मोठा कालपट आहे.''

पुढे त्यांनी ही कल्पना रविमुकुलला‌ही सांगितली होती.


त्यानंतरच्या काळात दादांचं पुण्याला येणं कमी झालं आणि एक दिवस मेहतांकडून निरोप आला-

'रणजित देसाई गेले!'

त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी मेहतांच्या पेरूगेट जवळच्या ऑफिसमध्ये आणण्यात येणार होतं. तेव्हा त्यांच्या अंत्यदर्शनाला मी गेलो होतो.

दादांच्या माझ्याकडच्या आठवणी म्हणजे, त्यांच्या सहीचं एक पत्र आणि अकरा भागांतल्या 'श्रीमान योगी' च्या पहिल्या भागावर असलेली त्यांची सही हे दोन्ही जपून ठेवले आहेत!

**– निरंजन घाटे**



## साहित्यातील स्त्री : व्यथा, वेदना आणि संघर्ष

*स्त्री आणि तिचं भावविश्व, लेखिकांनी टिपलेल्या स्त्रियांच्या व्यथा आणि पुरुष लेखकांच्या नजरेतून स्त्रियांची रेखाटली जाणारी प्रतिमा, यांचा थोडक्यात आढावा प्रस्तुत लेखात घेतला आहे. या लेखात अमृता प्रीतम यांच्या१९७६ मध्ये प्रकाशित झालेल्या आत्मकथेपासून ते प्रियांका पाटील यांच्या २०२१मध्ये प्रकाशित झालेल्या कथासंग्रहापर्यंत मला भावलेल्या पुस्तकांमधील स्त्रीच्या भावविश्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे...*

'ज्ञानपीठ पुरस्कार'प्राप्त, सहस्रकाची कवयित्री म्हणजे अमृता प्रीतम-ज्या आपल्या मर्जीनुसार आयुष्य जगल्या, अगदी मुक्तपणे...पण स्वैर नाही. वयाच्या सहाव्या वर्षी प्रीतमसिंह यांच्याशी झालेला विवाह; पण संवेदनशील मनाचा साहिर भेटल्यानंतर त्याच्यावर असलेलं प्रेम न लपवल्यामुळे वैवाहिक आयुष्यात माजलेली खळबळ... पण दुर्दैवाने फाळणीमुळे साहिरचंही प्रेम हरवलं. त्या विरहातून बाहेर पडताना झालेला 'इमरोज'शी परिचय. 'अमृता-इमरोज' ४० वर्षांचा सहवास... 'अमृता-इमरोज' म्हणजे कविता आणि प्रतिमा यांचं नातं. त्यांच्या बंडखोर निर्णयामुळे बरेचदा आलेले शंकास्पद, कटू अनुभव, हे त्यांच्या कविता आणि कथांमधून चित्रित झाले आहेत. 'कहानियों के आँगन मे' या कथासंग्रहातील कथा त्या काळाच्या मनाने अत्यंत धाडसी होत्या. या कथासंग्रहाचा मराठी अनुवाद माधवी देसाई यांनी केला होता. त्यांतले दुःख-भोग वाट्याला आलेल्या स्त्रियांची कहाणी मनाला हेलावून टाकते. त्यांचे 'रसीदी टिकट' हे आत्मचरित्र त्यांच्या आयुष्याच्या जमा-खर्चाच्या कागदावर लावलेलं पावतीचं तिकीट आहे, असं त्या म्हणतात. म्हणूनच मीच काय, माझ्याप्रमाणे अनेकजण आजही अमृताजींचे चाहते आहेत.

'नाच ग घुमा' हे माधवी देसाई यांचं 'आत्मकथन' वाचलं. जेव्हा हे पुस्तक हाती लागलं आणि वाचायला घेतलं... आणि अगदी झपाटल्याप्रमाणे अक्षरश: दोनच दिवसांत पूर्ण केलं... केलं; पण मन अगदी सुन्न झालं. हृदय अगदी कोणीतरी पिळवटून टाकल्यावर जी अनुभूती येईल, तसं मला दोन-तीन दिवस जड जड झालं होतं.

त्यापूर्वी माधवी देसाईंची फक्त... रणजित देसाई यांच्या पत्नी, एवढीच एक ओळख मला होती. १९८८मध्ये या पुस्तकाची पहिली आवृत्ती निघाली. आज साधारण ३५ वर्षांनंतरही पुरुषप्रधान मानसिकतेत फारसा फरक पडला आहे, असं मला जाणवत नाही, हेही खेदानंच सांगावं लागतं. त्यामुळे ते वाचताना पुरुषांनी उभारलेल्या खेळात आजची स्त्री ही कुठेतरी रिंगण धरून 'नाच ग घुमा...कशी मी नाचू' या ठेक्यात गोल फिरत आहे, तो ठेका, ते रिंगण भेदण्याचं धाडस तिच्याकडे म्हणजे आमच्या पिढीतील स्त्रियांकडे आजही नाही, कदाचित कुटुंबव्यवस्था मोडकळीस येऊ नये, म्हणूनही तिने स्वखुशीने हा फेर स्वीकारला असेल...कारण रिंगण सोडलं तर मुलांची होणारी ससेहोलपट आपल्यामुळे आहे, हा अपराधभावही जगणं असह्य करतो.

माधवी देसाई या पूर्वाश्रमीच्या सुलोचना भालजी पेंढारकर. भालजी पेंढारकर त्या काळचे मराठी चित्रपट सृष्टीत अग्रेसर असलेले दिग्दर्शक, निर्माता आणि खूप मोठ्ठं नाव... त्यांना तीन बायका आणि चार मुलं. मुलांना मिळालेला सर्वसामान्य मुलांचा संस्कार कुठेही त्यांच्यात अहंकार निर्माण करत नाही. शिक्षण चालू असतानाच लहान वयात चांगलं स्थळ आलं म्हणून गोव्याला नरेंद्र काटकर यांची पत्नी म्हणून गेल्यानंतर एका सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे एक साधं आयुष्य विनातक्रार जगत शिक्षण पूर्ण केलं. शिक्षिकेची नोकरी धरली. इतकं साधं आयुष्य त्या जगत होत्या की, त्या राहत असलेल्या चाळीत एकदा लतादीदी रात्रभर राहून गेल्या तरी कोणाला साधी शंकाही आली नाही की या 'त्या' लता मंगेशकर असतील. याच काळात लिखाणाची आवडही रुजली. काटकरांपासून तीन मुली झाल्या... पण नियतीने खेळ केला. नरेंद्र काटकरांचा अचानक झालेला मृत्यू हतबल करून गेला; पण वडिलांची शिकवण, कितीही दु:ख असलं तरीही घरात आतल्या खोलीत रडायचं आणि बाहेर हसतच लोकांपुढे यायचं; कारण जगाला तुमच्या दु:खाशी काही घेणं-देणं नसतं. तशातच भेट झाली रणजित देसाई यांच्याशी आणि ते त्यांच्या प्रेमात पडले. प्रेमाच्या आणाभाका व्यक्त करणारी कितीतरी पत्रं त्यांनी पाठवली. ते म्हणायचे, 'या जगात माझ्यासाठी लोकसंख्या दोनच... एक मी आणि तू सोबत असशील तर तू, अशी दोन.' म्हणजे, लेखिका म्हणते की माझ्या जागी दुसरी जरी कोणी असती तर तीही भुलली नसती तर विशेष. त्यांच्याबरोबर लग्न करण्यासाठी पहिल्या पत्नीला, जी गेल्या बावीस वर्षांपासून मनोरुग्णालयात

होती, तिला घटस्फोट दिला, जो सहज सोपा होता; पण लग्न करून देसाई यांच्या घरी कोवाडला गेल्यानंतर एक माणूस म्हणून आलेला अनुभव कसा होता, हे पुस्तक वाचल्याशिवाय कळणार नाही. तरीही एका नावाजलेल्या लेखकाची दुसरी पत्नी, जिचं पहिलं लग्न झालेलं आहे, अशा स्त्रीला समाजाकडून मिळणारे टोमणे आणि त्यांना नवऱ्याने प्रतिउत्तरही न देणं, ही मनाला अस्वस्थ करणारी बाब नियमित घडत असे. तरीही बावीस वर्षं मनोरुग्णालयात असणाऱ्या त्यांच्या पत्नीलाही भेटून तिला चांगलं करण्याचं, त्यांच्या मुलींची आईशी भेट घालून देण्याचं सत्कार्य त्या करत होत्या. त्यांच्या लेखनाचं श्रेयही समाज, देसाई यांची पत्नी म्हणूनच देत होता; पण त्यांची तगमग, होणारी घालमेल आणि चौदा वर्षांनंतर 'मी तुझ्यासोबत राहू शकत नाही, मला घटस्फोट हवाय' असं नवऱ्याकडून ऐकल्यानंतर झालेली घुसमट, कुचंबणा ही बरेचदा अनेक स्त्रियांची होत असते. त्या वेळी त्यांच्या कधीही पद्मश्री न मिळालेल्या वडिलांनी दिलेली समज - 'वासनेतून निर्माण झालेल्या नात्यांचा शेवट असाच होतो' हे तत्त्वज्ञान जास्त मोलाचं वाटतं. समाजाने दिलेल्या पुरस्कारापेक्षाही विचारांमधली प्रगल्भता ही किती श्रेष्ठ असते, याचं यथार्थ विश्लेषण या आत्मकथनात आहे.

म्हणूनच लेखिका म्हणते, 'आता गळ्यात सौभाग्य अलंकार नसतो; पण कपाळावर लालभडक कुंकू असतं. ती निशाणी असते माझ्या प्रिय हिंदू धर्माची! अनेक रूपांत बदलत गेलेल्या भारतीय स्त्री जीवनाची! ती कपाळावरची रक्तरंजित खूण असते! मी भोगलेल्या वेदनेची, शोकाची, सुखाची आणि मोहाचीही! मोहाच्या फुलांचा रंग लालच असावा... बहुधा....'

ज्येष्ठ साहित्यिक, पानिपतकार विश्वास पाटील यांच्या 'नागकेशर' या कादंबरीत राजकारणातील स्त्री पात्रांचं अतिशय रंजक आणि वास्तववादी चित्रण असल्यामुळे 'नागकेशर'विषयी मला लिहावंसं वाटलं. साधारण चारशे पानांची ही कादंबरी अतिशय प्रवाही असल्यामुळे एका बैठकीतच वाचून पूर्ण होते. राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबाची सत्ता, संपत्ती, अतिमहत्त्वाकांक्षा, ईर्ष्या यामुळे होणारी वाताहत, त्याचे विदारक पण वास्तववादी चित्रण या कादंबरीत आहे.

बरेचदा आपण सर्वसामान्य माणसं राजकारणी लोकांच्या वैयक्तिक आयुष्याविषयी अनभिज्ञ असतो आणि जे काही आपल्यासमोर येत असतं त्या-

मागचं राजकारण वेगळंच असतं. ज्याप्रमाणे झाडांच्या मुळांची जमिनीखाली गुंतागुंत असते, त्याचप्रमाणे मानवी नात्यांच्या गुंतागुंतीचं चित्रण या कादंबरीत दिसतं.

सहकारमहर्षी बापूराव डोंगरे देशमुख व त्यांचे बंधू बबन नाना या दोन कुटुंबांची सत्ता, पैसा, लालसा, अहंकार यामुळे होणाऱ्या वाताहतीचं चित्रण करणारी ही कादंबरी आहे. बापूरावांचे चिरंजीव प्रिन्स आणि बबनरावांचे चिरंजीव बाजीराव व त्यांच्या बायका शलाका आणि नेत्रा यांच्यातील राजकीय शीतयुद्ध हळूहळू चव्हाट्यावर येतं.

त्यांच्यातील रस्सीखेच ही लोकांच्या दृष्टिआड होऊ शकत नाही. प्रिन्सबरोबर विवाहासाठी दोन वर्षं वाट पाहिल्यानंतर नाईलाजाने बबनरावांच्या पहिलवान पण गुडघ्यात भेजा असलेल्या बाजीरावाशी विवाहाच्या प्रस्तावास होकार देणारी नेत्रा प्रिन्सबद्दलच्या सूडबुद्धीमुळे इरेला पेटते. प्रिन्स मात्र विवाहित असलेल्या शलाकाबरोबर विवाह करतो. शलाका दोन विवाह करूनही अतिशय विचारी व संयमी असल्याने, राजकारणाची पार्श्वभूमी नसतानाही आगेकूच करते. यावरूनच सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तींमुळे होणारे मार्गक्रमण सकारात्मक आणि नकारात्मक कसे असू शकते, याचा अनुभव येतो. 'पोट आणि पोटचं' या दोन केंद्रबिंदूंभोवती फिरणारं आणि प्रसंगी कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळणाऱ्या महाराष्ट्रातील पुरोगामी राजकारणाचं कादंबरीतील चित्रण महत्त्वपूर्ण आहे. मानवी मन, त्याच्या नकारात्मक प्रवृत्ती, संयमाचा अभाव या गोष्टी राजकीय जीवनातही कशा धोकादायक ठरू शकतात, याचं यथार्थ चित्रण करण्यात विश्वास पाटील यशस्वी झाले आहेत. कादंबरीतील वातावरण, साखरेचं राजकारण, मेडिकल कॉलेज, काही पात्रांची आडनावे यामुळे कादंबरीतील कथानक नगर जिल्ह्यातीलच असावं, असं वारंवार वाटतं. प्रिन्स आणि शलाका नायक-नायिका, तर बाजीराव आणि त्याची पत्नी नेत्रा हे खलनायक-खलनायिका; मात्र शलाका विवाहित असूनही घटस्फोटाशिवाय प्रिन्सबरोबर दुसरे लग्न करते, तो संसार तडीस नेते. हे धाडसही स्त्री करू शकते. मराठी साहित्यात, राजकीय पार्श्वभूमी असलेल्या मोजक्या कादंबऱ्यांमध्ये 'नागकेशर'चा समावेश होईल. ज्याप्रमाणे नागकेशर ही वेलवर्गीय वनस्पती शेतात आल्यास उभ्या पिकाला उद्ध्वस्त करते, त्याचप्रमाणे राजकीय ईर्ष्या, लालसा, अतिमहत्त्वाकांक्षा राजकारणात फोफावल्याने कसा विनाश होतो, याचं प्रभावी चित्रण या कादंबरीत आहे.

डॉ. रंगनाथ पठारे, ज्यांच्या चाळीसहून अधिक साहित्यकृती प्रकाशित

आहेत, त्यांनी वीस वर्षांहून अधिक काळ अभ्यास करून लिहिलेली 'सातपाटील कुलवृतांत' ही सातशे वर्षांचा अजस्र पट उलगडणारी कादंबरी, अतिशय रंजक आणि मानवी मनाच्या गुंतागुंतीबरोबरच अनेक पैलू उलगडणारी कदाचित मराठीतील एकमेव कादंबरी. यातून लेखकाने देवनाथ या सध्याच्या काळातील विज्ञानवादी प्राध्यापक असूनही समाजासोबत राहण्यासाठी कर्मकांड स्वीकारणारा व्यक्ती स्वत:चा सातशे वर्षांचा कुलवृत्तांत उलगडतो. आयुष्यभर ज्या जातीच्या फोल अहंकारात माणूस जगतो; पण त्याला त्याचा कुलवृत्तांत अभ्यासल्यावर ब्राह्मण, महार, अफगाण म्हणजेच मुस्लीम अशा विविध जाति-धर्मांच्या मर्यादा ओलांडून आपली वंशवेल कशी विस्तारली आहे याचे रंजक आणि वैचारिक चित्रण केले आहे. आपला मूळ पुरुष अफगाणी आहे हे सांगतानाही लेखक कचरला नाही; पण त्याचबरोबर विवाह, लैंगिक संबंध, त्यात असलेली मोकळीक, काळाप्रमाणे त्यावर आलेल्या मर्यादा, यावरून एका प्रगतिशील काळाचं दर्शन होतं. त्याचबरोबर सृष्टीची अमर्याद महानता, यापुढे माणसाचा कवडीमोलही नसलेला अहंकार आपण किती जपतो हे लेखकाने यात व्यक्त केलं आहे.

मला यात जास्त भावलं ते म्हणजे, ही सातपाटील -श्रीपती, साहेबराव, दसरत, जानराव, राखमाजी आणि पिराजी, शंभूराव आणि देवनाथ यांची जरी कहाणी असली तरी ती खऱ्या अर्थाने त्यांच्या पाटलिणीची कथा आहे, असं वाटतं. स्त्रीप्रधानता म्हणजेच मातृसत्ताक पद्धती किंवा स्त्रीमधील खंबीर आणि परखड नेतृत्व, हे समाजास म्हणजेच कुलवृत्तांत विकासास किती मोठ्या प्रमाणात हातभार लावणारं आहे, हे कादंबरी वाचल्याशिवाय लक्षात येत नाही. यातील सर्व नायिका आणि  सहनायिका या त्या त्या काळाच्या मानाने खंबीर निर्णयक्षमता असलेल्या आणि प्रसंगी आक्रमकदेखील आहेत. यातील आरेना, आफुबाई, भीमबाई, देहूबाई या सर्व धडाडीच्या आहेतच; पण मला जास्त भावलं ते उल्फीचं पात्र. उल्फी ... तिच्या सौंदर्यावर भाळून पाहता क्षणी तिच्या प्रेमात पडणारा पिराजी, विवाह न करताही त्याच्या मुलाला जन्म देणारी ही कोल्हाटी समाजातील स्त्री पिराजीवर विषप्रयोग झाल्यावर एका इंग्रज अधिकाऱ्याच्या आश्रयाला जाते. त्याच्याबरोबर इंग्लंडलाही जाते. खूपच रंजक आणि प्रभावी पात्र आहे. या कादंबरीतील नायिका आणि सह-नायिका या धडाडीच्या, कर्तृत्व असलेल्या स्त्रिया आहेत.

अमृता प्रीतम यांच्याप्रमाणेच धाडसाने स्त्रियांच्या आजच्या काळातील व्यथा व्यक्त करणारी ही तरुण मुलगी. तिचं 'इब्रू' हे पुस्तक वाचताना मन सुन्न होतं. स्त्री-पुरुष नात्यात स्त्रीमनाची होणारी घुसमट ही या नव्या युगातील स्त्रीची आहे. 'इब्रू' या मूळ कन्नड शब्दाचा अर्थ 'दोघी' असा होतो. ही समलिंगी संबंधांवर आधारित कथा आहे. यातील प्रत्येक कथा ही लेखिकेच्या वैचारिक प्रगल्भतेचं दर्शन घडवते. समाजातील तृतीयपंथीयांना मिळणारी उपेक्षा अगदी सहजपणे 'त्याच्यातील ती' या कथेत मांडली आहे. मला सर्वच कथा, जसं 'नास्तन,' 'डेस्टिनेशन,' 'निलावंती,' 'रणमर्दिनी,' 'बोगदा,' 'मोक्ष' या खूप भावल्या; पण त्यातही 'रांजण' या कथेत रांजणाचा रूपकात्मक केलेला उल्लेख तरुण स्त्रीच्या तारुण्यसुलभ भावनांचा होणारा कोंडमारा व्यक्त करतो. ब्रेस्ट कॅन्सरमुळे स्तन काढल्याने आलेलं अपुरेपण कथेतील नायिकेला तिच्या नवऱ्याकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे भरून निघतं. 'रणमर्दिनी' या कथेतील बलात्कारित स्त्री बाळाला जन्म देऊन स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून यशाच्या शिखरावर जाते, ही खूपच प्रेरक कथा आहे.

लेखिका म्हणते, 'समाजाच्या साचेबद्ध चौकटीतून बाहेर फेकलेल्या या बायका - कुणी विधवा, घटस्फोटित, कुणी नवऱ्यानं वाऱ्यावर सोडलेली बाई, कुणी बिन बापाची, तर कधी वेश्या, तर कधी तृतीयपंथी, कधी अफाट बुद्धिमत्ता आणि सौंदर्य असूनही शापित आयुष्य जगणारी, तर कुणी तारुण्य-सुलभ मोहाला-वासनेला संयमित करणारी, कुणी समाजातल्या अन्याय्य चालीरीतींना फाट्यावर मारणारी, तर कधी बलात्कारित, तर कधी स्तन गमावलेली ...अशा हाडामांसाच्या अनेक पात्रांनी माझं आयुष्य व्यापलं आणि मग त्या कथारूपात अवतरू लागल्या.' अशा समर्थ लेखिकेला माझा सलाम!!

म्हणूनच साहित्यातील स्त्री-प्रतिमांचा, त्यांच्या भावविश्वाचा अभ्यास हा अत्यंत महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या व्यथा, वेदनांमधून काळाचे पडसादही उमटतात. त्यांच्या विकासासाठी प्रेरणादायी वातावरण देणं, त्यांचे निर्णय समजून घेणं ही समाजाची जबाबदारी आहे.

**– डॉ. अनुश्री खैरे**



## महेश कोठारे यांनी साधला नाशिककरांशी संवाद


'लेखकाशी संवाद' या उपक्रमाअंतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक, अभिनेते महेश कोठारे यांनी 'डॅम इट आणि बरंच काही' या आत्मकथनाच्या निमित्ताने मुलाखतीचा कार्यक्रम नाशिक येथे पार पडला. ज्येष्ठ रंगकर्मी सदानंद जोशी यांनी महेश कोठारे यांच्याशी संवाद साधला. कुसुमाग्रज स्मारक येथे हा कार्यक्रम पार पडला.

कोठारे यांनी दिलखुलासपणे सर्व प्रश्नांना उत्तरे दिली. व अनेक किस्से सांगून उपस्थितांना खळझळून हसवले. लक्ष्या उर्फ लक्ष्मीकांत बेर्डे यांना कसे चित्रपटासाठी साइन केले, धुमधडाका चित्रपटाचा किस्सा, दुरचित्रवाणीवर मराठी चित्रपटाचे प्रक्षेपण होण्यात असलेला बाळासाहेब ठाकरेंचा वाटा इ. आठवणींना त्यांनी उजाळा दिला. यावेळी शब्दांकनकार मंदार जोशी, पुस्तकपेठ नाशिकचे निखिल दाते व मुक्ता दाते उपस्थित होते.

◆

पुरस्कार

## 'भाई वैद्य स्मृती पुरस्कार'



ज्येष्ठ इतिहास संशोधक व मेहता पब्लिशिंग हाऊसचे लेखक डॉ. जयसिंगराव पवार यांना 'भाई वैद्य स्मृती गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

हा कार्यक्रम नवी पेठेतील एस.एम.जोशी प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात पार पडला.

मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे डॉ. जयसिंगराव पवार यांचे हार्दिक अभिनंदन!

◆

### डॉ. जयसिंगराव पवार यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

- राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे
- आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध
- शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?
- राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे
- राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे
- राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे
- शिवछत्रपती : एक मागोवा
- मराठेशाहीचे अंतरंग
- छत्रपती संभाजी : एक चिकित्सा
- राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा
- मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध
- समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती
- क्रांतिसिंह नाना पाटील
- वेध अमुच्या इतिहासाचा
- छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ
- व्यक्तिवेध : शरद पवार... ते ...गोविंद पानसरे
- युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी
- शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना
- राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय
- दादाजी कोंडदेव कोण होता?



◆

# श्रद्धांजली

## प्रसन्न ओगले



'रुचिरा' हे पुस्तक महाराष्ट्रातील घराघरात पोहोचलं. या पुस्तकाच्या दोनही भागांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. या पुस्तकाच्या लेखिका कमलाबाई ओगले यांचे नातू प्रसन्न ओगले यांचं नुकतंच निधन झालं.

प्रसन्न ओगले हे पेशाने आर्किटेक्ट होते. त्यांची आजी कमलाबाई ओगले यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'कमलाबाई स्मृती पुरस्कार' ते देत असत. मेहता पब्लिशिंग हाऊस व ओगले परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार वितरण समारंभ होत असे. या पुरस्काराच्या रुपाने आपल्या आजीच्या स्मृती चिरंतन ठेवण्याचे काम त्यांच्यामार्फत होत होते. मेहता पब्लिशिंग हाऊसशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

◆



पुस्तकाच्या पानांतून




TBC-31 Book No. 4

# शल वी टेल द प्रेसिडेंट?

**जेफ्री आर्चर**

अनुवाद

**स्नेहा केतकर**

*वाचकांच्या मनाची पकड घेत पानापानांतून उलगडत जाणारी रहस्यमय कादंबरी..*

### २० जानेवारी, मंगळवार

### दुपारचे बारा वाजून सव्वीस मिनिटे

''मी फ्लॉरेन्टायना केन अशी शपथ घेते की...''

*''मी फ्लॉरेन्टायना केन अशी शपथ घेते की...''*

''अमेरिकन संघराज्याची अध्यक्षा म्हणून मी निष्ठापूर्वक कार्य करेन.''

*''अमेरिकन संघराज्याची अध्यक्षा म्हणून मी निष्ठापूर्वक कार्य करेन.''*

''आणि सर्वसामर्थ्यानिशी अमेरिकेच्या घटनेचे पालन व रक्षण करेन. हे ईश्वरा, या कार्यात तू मला साहाय्य कर.''



*“आणि सर्वसामर्थ्यानिशी अमेरिकेच्या घटनेचे पालन व रक्षण करेन. हे ईश्वरा, या कार्यात तू मला साहाय्य कर.”*

अमेरिकेच्या त्रेचाळीसाव्या अध्यक्षांचा हात अजूनही हातातल्या बायबलवरच होता. शपथ घेतल्यानंतर अध्यक्षांनी आपल्या यजमानांकडे पाहून स्मित केले. ही एका झगड्याची अखेर आणि दुसऱ्या झगड्याची सुरुवात होती. अर्थात फ्लॉरेन्टायना केनना अशा झगड्यांची आता सवय झाली होती. प्रथम काँग्रेसमध्ये निवडून येण्यासाठी त्यांना जबरदस्त लढत द्यावी लागली होती. त्यानंतर सिनेटमध्ये येण्यासाठी आणि चार वर्षांपूर्वी अमेरिकेच्या उपाध्यक्षपदासाठीही त्यांना झगडावे लागले होते. प्राथमिक फेरीनंतर, चुरशीच्या लढतीत त्यांनी सिनेटर राल्फ ब्रुक्स यांचा पराभव केला होता. गेल्या जूनमध्ये झालेल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या अधिवेशनात त्यांना अध्यक्षपदाची उमेदवारी देण्यात आली होती. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराचा त्यांनी फक्त १,०५,००० मतांनी पराभव केला. अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच इतक्या कमी मतांच्या फरकाने, फक्त एका टक्क्याच्या आघाडीने अध्यक्ष निवडून आले होते. याआधी १९६०मध्ये जॉन एफ. केनेडी यांनी रिचर्ड निक्सन यांचा १,१८,००० मतांनी पराभव केला होता.

टाळ्यांचा कडकडाट थांबल्यानंतर अध्यक्षांना एकवीस तोफांची सलामी देण्यात आली. सलामी झाल्यानंतर अध्यक्षा फ्लॉरेन्टायना केन भाषणासाठी उभ्या राहिल्या. घसा खाकरून आणि एक दीर्घ श्वास घेऊन त्यांनी कॅपिटॉल प्लाझावर जमलेल्या पन्नास हजार लोकांकडे आणि दूरचित्रवाणीवर समारंभ बघणाऱ्या नागरिकांकडे बघून, आपल्या भाषणाला सुरुवात केली. जानेवारी महिना असूनही हवेत बोचरा गारवा नव्हता. साधारणपणे या महिन्यात लोकांना लोकरी कपड्यांशिवाय, ओव्हरकोटशिवाय बाहेर पडणे मुश्कील होत असे; पण आज मात्र अशा कपड्यांची गरज भासत नव्हती. कॅपिटॉल हिलसमोरची हिरवळ ओलसर होती; पण बर्फाच्छादित नव्हती.

“उपाध्यक्ष ब्रॅडले, मुख्य न्यायाधीश, अध्यक्ष कार्टर, अध्यक्ष रेगन आणि बंधू-भगिनींनो...” अध्यक्षांचे पती मन लावून भाषण ऐकत होते. आपल्या पत्नीच्या भाषणातील त्यांनी स्वत:च लिहून दिलेली काही वाक्ये,

शब्द ऐकून मधूनच स्वत:शी हसत होते.

आज त्यांचा दिवस सकाळी साडेसहालाच सुरू झाला होता. खरं सांगायचं तर, आदल्या दिवशी संध्याकाळी भावी अध्यक्षांच्या सन्मानार्थ झालेल्या सोहळ्यानंतर त्या दोघांनाही रात्री नीट झोप लागली नव्हती. फ्लॉरेन्टायना केन यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणावर पुन्हा एकदा शेवटची नजर टाकली. महत्त्वाच्या शब्दांखाली खुणा केल्या. भाषणात मात्र त्यांनी फारसे बदल केले नाहीत.

सकाळी उठल्यानंतर त्यांनी आपला आवडता निळ्या रंगाचा पोशाख परिधान केला. त्या पोशाखावर रिचर्डने, त्यांच्या प्रथम पतीने दिलेला ब्रूच त्यांनी लावला. रिचर्डने मरण्याआधी तो ब्रूच त्यांना दिला होता. जेव्हा जेव्हा त्यांना रिचर्डची तीव्रतेने आठवण येत असे, तेव्हा तेव्हा त्या हा ब्रूच लावत असत. रिचर्डच्या अपघाताचा प्रसंग अजूनही त्यांच्या डोळ्यांपुढे येत होता. हार्वर्ड विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचे भाषण ठेवले होते. त्या भाषणाला हजर राहण्यासाठी रिचर्डने आटोकाट प्रयत्न केले; पण कामगारांच्या संपामुळे त्याला विमान पकडता आले नाही. तरीही भाड्याची गाडी घेऊन तो फ्लॉरेन्टायनाकडे यायला निघाला. यावेळी आपण फ्लॉरेन्टायनाच्या जवळ असावे, असे त्याला मनापासून वाटत होते; पण दैवाला ते मंजूर नव्हते. 'न्यूजवीक' साप्ताहिकाच्या मते त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आरंभ याच भाषणामुळे झाला. मात्र, रिचर्ड हे भाषण कधीच ऐकू शकला नाही. फ्लॉरेन्टायना हॉस्पिटलमध्ये पोचायच्या आधीच त्याचे निधन झाले होते.

एका क्षणात त्या भानावर आल्या. त्यांना वास्तवाची जाणीव झाली. सध्या त्या पृथ्वीतलावरील एका बलाढ्य राष्ट्राच्या नेत्या होत्या. जागतिक राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत होत्या; पण तरीही त्या रिचर्डला परत आणू शकत नव्हत्या.

त्यांनी पुन्हा एकदा आरशात निरखून पाहिले. त्यांच्यावर समारंभाचे दडपण अजिबात आले नव्हते. अर्थात अध्यक्ष पार्किन यांच्या आकस्मिक निधनामुळे गेली दोन वर्षे त्या अध्यक्ष म्हणूनच काम पाहत होत्या. अध्यक्ष पार्किन यांच्या निधनाची बातमी जेव्हा त्यांना कळली, तेव्हा त्या आपला

जुना मित्र आणि भावी पती एडवर्ड विन्चेस्टर यांच्याबरोबर गोल्फ खेळत होत्या. इतिहासकारांना जेव्हा ही गोष्ट कळेल, तेव्हा त्यांना आश्चर्यच वाटेल. हेलिकॉप्टर्स जेव्हा त्यांच्या डोक्यावर घिरट्या घालायला लागली, तेव्हा त्यांनी आपला खेळ थांबवला. त्यातले एक हेलिकॉप्टर खाली उतरले, त्यातून एक कॅप्टन उतरला आणि त्यांच्या दिशेने धावत आला. त्याने सलाम ठोकला आणि त्यांना सांगितले, ''मॅडम प्रेसिडेंट, अध्यक्षांचे निधन झाले आहे.'' आता अमेरिकेच्या लोकांनी केन यांना निवडून देऊन, त्यांच्यावरचा आपला विश्वास व्यक्त केला होता. अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच इतक्या महत्त्वाच्या जागी एका स्त्रीला निवडून देण्यात आले होते.

अध्यक्षांनी आपल्या बेडरूमच्या खिडकीतून बाहेर नजर टाकली. सकाळच्या उन्हात पोटोमॅक नदीचे पाणी चमकत होते. आपल्या बेडरूममधून बाहेर पडून त्या सरळ आपल्या खासगी जेवणघरात गेल्या. तिथे विल्यम आणि ॲनाबेल या त्यांच्या मुलांबरोबर एडवर्ड गप्पा मारत बसले होते. त्या तिघांबरोबर अध्यक्षांनी नाश्ता केला. बोलता बोलता काही जुन्या आठवणीही निघाल्या; पण जेव्हा घड्याळात आठचे टोल पडले, तेव्हा मात्र फ्लॉरेन्टायना केन ओव्हल ऑफिसमध्ये जाण्यासाठी उठल्या.

बाहेरच्या व्हरांड्यात जॅनेट ब्राउन त्यांचीच वाट बघत उभी होती. जॅनेट ब्राउन ही अध्यक्षांच्या हाताखालच्या सर्व कर्मचाऱ्यांची प्रमुख होती.

''गुड मॉर्निंग, मॅडम प्रेसिडेंट.''

''गुड मॉर्निंग, जॅनेट. सर्व गोष्टी सुरळीत चालल्यात ना?'' त्यांनी हसून विचारले.

''होय मॅडम.''

''ठीक. मग नेहमीप्रमाणेच तू मला पूर्ण दिवसाचा कार्यक्रम लिहून दे. माझी काळजी करू नकोस. आता प्रथम कोणते काम आहे?''

''आपल्याला अभिनंदनपर ८४२ तारा आणि २,४१२ पत्रं आली आहेत; त्यांना तातडीने उत्तरे देण्याची गरज नाही; पण सर्व राज्यांच्या प्रमुखांच्या पत्रांना मात्र उत्तरे जाणे आवश्यक आहे. मी बारा वाजेपर्यंत ही सारी पत्रोत्तरे तयार करून ठेवते.''

''त्या पत्रांवर आजचीच तारीख घाल. ती पत्रं तयार झाली की, मी लागलीच सह्या करून टाकीन.''

‘‘होय मॅडम. तुमच्या दिवसाचा कार्यक्रमही आखलेला आहे. सकाळी अकरा वाजता माजी अध्यक्ष रेगन आणि कार्टर यांच्या समवेत कॉफीपान आहे. त्यानंतर तुम्हाला उद्‌घाटनासाठी जायचे आहे. उद्‌घाटनानंतर सिनेटमध्ये दुपारचे भोजन आहे. भोजनानंतर व्हाइट हाउससमोरील कवायत पाहण्यासाठी आपणाला हजर राहायचे आहे.’’

जॅनेट ब्राउनने टाचणीने टाचलेली कार्डं अध्यक्षांच्या हाती दिली. फ्लॉरेन्टायना केन काँग्रेसमध्ये निवडून आल्यापासून, गेली पंधरा वर्षे जॅनेट ब्राउन त्यांच्याबरोबर काम करीत होती. त्या कार्डांवर अध्यक्षांचा दर तासाचा कार्यक्रम लिहिलेला होता. त्या कार्यक्रमांवर नजर टाकत, त्यांनी जॅनेट ब्राउनचे आभार मानले. तेवढ्यात एडवर्ड विन्चेस्टर आत डोकावले आणि हसले. त्यांच्या हसण्यातून नेहमीच फ्लॉरेन्टायनाबद्दलचे प्रेम आणि कौतुक व्यक्त व्हायचे. अध्यक्ष पार्किन यांच्या आकस्मिक निधनाच्या दिवशीच फ्लॉरेन्टायनाने एडवर्डशी लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. याचा तिला आजपर्यंत कधीही पश्चात्ताप झाला नव्हता. रिचर्डलादेखील या निर्णयाने समाधान वाटले असेल असे त्यांना वाटायचे. एडवर्डकडे पाहत स्मित करीत त्या म्हणाल्या, ‘‘मी अकरा वाजेपर्यंत काम करणार आहे.’’ एडवर्डनी होकारार्थी मान हलवली आणि ते तयार होण्यासाठी निघून गेले.


◆

**कुंदन तांबे**

लेखक कुंदन तांबे यांनी विविध नामवंत मासिकांतून लेखन केलं होतं. त्यांचे नुकतंच निधन झाले असून, त्यांची ‘नाना आणि महादजी’ ही कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहे. कुंदन तांबे यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## नवी संहिता... नवा आशय...

# रिपोर्टिंग पाकिस्तान





**मीना मेनन**

अनुवाद : **मुक्ता देशपांडे**

इस्लामाबादमध्ये वास्तव्य करून पाकिस्तानचा आँखो देखा हाल माध्यमांतून मांडणाऱ्या मीना मेनन यांचं लक्षवेधी अनुभवकथन

**किंमत : ६००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# लाल बर्फाचे खोरे





**जीतेंद्र दीक्षित**

अनुवाद : **पराग पोतदार**

व्यापक ग्राऊंड रिपोर्टच्या माध्यमातून मांडली गेलेली बदलत्या काश्मीरची वस्तुनिष्ठ कहाणी

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# ड्रीम्स ऑफ जॉय

**लिसा सी**

अनुवाद

**सुनंदा अमरापूरकर**

*जॉय आणि पर्लच्या अमेरिका-चीन स्थलांतराची कथा...*
*स्थलांतरितांच्या असीम वेदनांची गाथा*

दूरवरून येणारा पोलीस व्हॅनच्या सायरनचा कर्कश आवाज माझी शांतता भंग करत गेला. रातकिड्यांची कधी न संपणारी कर्णकटू किरकिर सतत मी दोषी असल्याची जाणीव करून देत होती. त्या जाळीबंद व्हरांड्यात मी आणि माझी मावशी झोपत होतो. दोघींचे पलंग दोन टोकांना टाकलेले होते. तिच्या डबल बेडची करकर आणि त्याचबरोबर तिचं मुसमुसून रडणं ऐकू येत होतं. रात्री माझ्या आईचं आणि मावशीचं कडाक्याचं भांडण झालं होतं. दोघींनी एकमेकींची खोल गुपितं फोडून जणू एकमेकींच्या अंगावर भिरकावली होती. त्या वेळी झालेला अपमान, अपराधीपणा आणि मनोभंग यांचा हा उरलेला निचरा होत होता. माझ्या आईची पण हीच अवस्था



असेल का? मी कानोसा घेण्याचा प्रयत्न केला; पण तिची खोली फारच लांब होती. ही शांतता वेदनादायक होती. मी बिछान्यावरची चादर हातात घट्ट धरून छताला पडलेल्या एका जुन्या भेगेवर लक्ष केंद्रित करायचा प्रयत्न केला; पण कमालीचा प्रयत्न करूनही यश येत नव्हतं. माझ्या वडलांचा अपमृत्यू घडल्यापासून मला जणू एका कड्याच्या टोकावर उभी असल्यासारखं वाटायला लागलं होतं. आता त्या कड्यावरून आपल्याला कुणीतरी ढकलतं आहे आणि आपण खाली पडायला लागलो आहोत, असं वाटायला लागलं.

मला माझ्या जन्माबद्दल, आई-वडलांबद्दल, आजी-आजोबांबद्दल आणि मी कोण आहे त्याबद्दल जे काही माहीत होतं; ते सगळंच खोटं निघालं होतं. धादांत खोटं. मी ज्या स्त्रीला माझी आई समजत आले, ती माझी मावशी होती आणि मावशी ही माझी खरी आई होती. ज्या माणसाला वडील समजून मी त्यांच्यावर माया केली, तो माणूस माझा कुणीच नव्हता. माझे खरे वडील हे शांघायमधील एक चित्रकार होते. त्यांच्यावर माझी आई आणि मावशी दोघीही प्रेम करत होत्या. माझ्या जन्माआधीपासून आणि आंटी मेच्या शब्दात सांगायचं, तर हे फक्त हिमनगाचं वरचं टोक होतं; पण मी वाघाच्या वर्षात जन्माला आले होते. माझ्या वडिलांच्या मरणाला कारणीभूत ठरल्याचा अपराधी भाव आणि ही सगळी गुपितं कळल्यामुळे झालेली अपार मनोवेदना, यांनी माझा ताबा घेण्याआधी मी चादर घट्ट पकडून, दातांवर दात रोवून माझ्या भावना आवरून ठेवायचा प्रयत्न करू लागले. माझ्यातल्या वाघाच्या रानटीपणानं त्यांना दडपून टाकायचा प्रयत्न सुरू केला; पण काही उपयोग झाला नाही.

मला वाटलं, माझ्या मैत्रिणीशी हॅझेलशी बोलावं; पण त्या वेळी मध्यरात्र होऊन गेली होती. मग मला तीव्रतेनं वाटू लागलं की, आपण परत आपल्या शिकागो विद्यापीठात गेलो तर...? कारण तिथे माझा मित्र होता. जोई. मी कशा परिस्थितीतून जात आहे, ते त्याला समजू शकेल. तो नक्कीच समजून घेईल.

रात्रीचे दोन वाजून गेले होते. आता माझ्या मावशीला झोप लागली होती आणि घरातही पूर्ण शांतता झाल्यासारखी वाटली. मी उठले आणि हॉलमध्ये गेले. तिथे एका कापडी कपाटात माझे कपडे ठेवलेले असत. तिथून मला आईचा विलाप ऐकू येत होता. अक्षरश: हृदय विदीर्ण करून टाकणारा.

मी काय करणार आहे, याची तिला कल्पनाच करता येणं शक्य नाही आणि जर समजा कल्पना करता आलीच, तरी ती मला थांबवण्याचा प्रयत्न

करील? मी काही तिची खरी मुलगी नाही. ती कशाला मला थांबवेल? मी भराभर बॅग भरली. कुठेही जायचं असलं तरी मला पैसे लागणार होते. ते मिळवण्याची एकच जागा मला माहीत होती आणि तिथून पैसे घेतले असते तर माझी जास्तच मानहानी झाली असती आणि लाजिरवाणेपणा येणार होता. तरी मी स्वयंपाकघरात धावले, सिंकखाली पाहिलं. तिथे कॉफी कॅन होता. त्यातच माझी आई माझ्या कॉलेज-शिक्षणासाठी पैसे साठवीत असे. ही रक्कम म्हणजे तिनं माझ्याकरता पाहिलेल्या सर्व स्वप्नांचं आणि आशा-आकांक्षांचं प्रतीकच होतं; पण आता मी तिची 'ती मुलगी' राहिलेली नव्हते. ती नेहमीच सावध असायची; पण आयुष्यात एकदाच मला त्याबद्दल कृतज्ञता वाटली. अमेरिकन लोकांबद्दल आणि बँकांबद्दल तिला वाटणाऱ्या अविश्वासामुळेच मला पळून जाणं शक्य होणार होतं.

मी एक कागद घेतला, पेन्सिल घेतली आणि किचन टेबलापाशी बसून चिठ्ठी खरडली.

'मॉम, मी कोण आहे' याचीच मला इथून पुढे शंका वाटणार आहे. हा देश काय आहे, हेही मला समजत नाहीये. माझ्या वडलांना या देशानं मारलं, या गोष्टीचा मला तिरस्कार वाटतो. तुला वाटेल की, मी गोंधळले आहे आणि मी मूर्ख आहे, हेही मला माहीत आहे. असेनही मी तशी; पण मला उत्तरं शोधायची आहेत. कदाचित चीन हेच माझं खरं घर असेल...'

पुढे मी लिहिलं की, 'मी माझ्या खऱ्या वडलांना शोधायला चालले आहे आणि तू नको माझी काळजी करू.' तो कागद मी घडी घालून पोर्चमध्ये घेऊन गेले. मी तो माझ्या उशीवर ठेवला. तेव्हा आंटी मेनं कोणतीही हालचाल केली नाही. पुढच्या मुख्य दरवाज्याशी आले, तेव्हा मी जराशी घुटमळले. माझा अपंग काका घराच्या मागच्या खोलीत झोपलेला होता. त्यानं मला कधीही दुखावलं नव्हतं. मी त्याला 'गुडबाय' म्हणायला पाहिजे होतं. तो काय म्हणणार, हे मला ठाऊक होतं, ''कम्युनिस्ट माणसं वाईट. ते तुला मारून टाकतील.'' हे शब्द मला ऐकायचे नव्हते. त्याच्या बोलण्यानं माझी आई आणि मावशी सावध होतील, मग मी घरातून निघाल्याचं त्यांना कळेल; हेही मला नको होतं.

मी सूटकेस उचलली आणि मध्यरात्रीच घराबाहेर पडले. कोपऱ्यापाशी अल्पाइन स्ट्रीटवरून वळून युनियन स्टेशनकडे चालू लागले. ती तारीख होती, २३ ऑगस्ट, १९५७. मला हे सगळं नीट लक्षात ठेवायचं होतं; कारण मी पुन्हा कधी या लॉस एंजिलिसच्या चायना टाउनला येईन की नाही, याबद्दल मी साशंक होते. या गल्लीबोळांतून फेरफटका मारायला मला खूप आवडत होतं. जगातल्या कोणत्याही ठिकाणापेक्षा मला या ठिकाणाची जास्त माहिती होती. मी इथल्या प्रत्येकाला ओळखत होते आणि प्रत्येक जण मला ओळखत होता. इथली घरं... जवळजवळ सगळे पत्र्याचे बंगले. मी त्यांना 'चायनाळलेली घरं' म्हणायची. बागेत बांबूची झाडं लावलेली. पोर्चमध्ये छोट्या कमक्वाट रोपांचे बॉन्साय केलेले... अंगणात फळ्या टाकून त्यावर पक्ष्यांसाठी शिळा भात पसरून ठेवलेला. या सगळ्याकडेच मी आता वेगळ्या नजरेनं बघू लागले होते. कॉलेजचे नऊ महिने आणि आज रात्रीच्या घटना यामुळे ते झालं होतं. शिकागोच्या माझ्या पहिल्या शैक्षणिक वर्षात मी बरंच काही शिकले होते आणि केलंही होतं. मला जोई भेटला होता आणि मी 'चायनीज स्टुडन्ट्स डेमोक्रेटिक ख्रिश्चन असोसिएशन'ची सदस्य झाले होते. मी 'पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना' आणि चेअरमन माओ त्या देशासाठी करत असलेलं काम यांविषयी बरंच वाचलं होतं. अर्थात माझ्या घरातल्या माणसांचे विचार त्याच्या विरुद्ध होते. त्यामुळे जेव्हा जून महिन्यात मी घरी आले, तेव्हा काय केलं? माझ्या वडलांवर टीका करत राहिले की, 'काय तुमचं दिसणं... जणू काही आत्ताच गावाकडून आलात बोटीमधून. ते पदार्थ तरी कसले तेलकट बनवता त्या तुमच्या कॅफेमध्ये आणि कसले ते मठ्ठ टीव्ही शोज बघत राहता तुम्ही... शी:!'

या आठवणी आल्या आणि त्यांच्या मृत्यूपासून माझ्या डोक्यात सतत वाजत आलेला संवाद पुन्हा मोठ्यानी ऐकू येऊ लागला. माझे आई-वडील कोणत्या दिव्यातून जात होते, ते मला का दिसू शकलं नाही? माझे वडील 'कागदावरचा मुलगा' होते आणि या देशात बेकायदेशीर रीतीनं आलेले होते, हे मला माहीत नव्हतं. जर ते माहीत असतं, तर मी त्यांना 'एफ.बी.आय.'पुढे शरणागती पत्करा म्हणून कधीही सांगितलं नसतं. (मला वाटत होतं, त्यांच्यापाशी लपवण्यासारखं काहीच नाही म्हणून...) माझी आई, जे काय घडलं, त्याबद्दल आंटी मेलाच दोषी ठरवत आहे; पण ते चुकीचं आहे. आंटी मेदेखील स्वत:लाच दोषी ठरवत आहे. काही तासांपूर्वीच तिनं पोर्चमध्ये बोलताना याची


कबुली दिली. तो एफ.बी.आय.चा एजंट चायना टाउनमध्ये आला, तेव्हा मीच त्याच्याशी सॅमबद्दल बोलले होते; पण माझ्या वडलांचं चायना टाउनमध्ये राहणं हे कायदेशीर होतं की नाही, याबद्दल त्या एजंट सँडर्सला खरं देणं-घेणं नव्हतंच. त्यानं सगळ्यात पहिल्यांदा माझ्याबद्दलच विचारलेलं होतं.

मग तर मला अपराधीपणा आणि दु:ख यांचा फास गळ्याभोवती जास्तच घट्ट आवळल्यासारखं वाटायला लागलं. मी ज्या संघटनेत सामील झाले होते, ती एफ.बी.आय.च्या दृष्टीनं एक कम्युनिस्ट चळवळ होती, याची मला कशी कल्पना असणार? ज्या दुकानात निग्रो लोकांना काम करायला देत नसत अथवा काउंटरवर सर्वांसोबत जेवणासाठी बसू देत नसत, त्यांच्याविरुद्ध आम्ही निषेध मोर्चे काढले. युद्धकाळात अमेरिकन सरकारनं जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना कसं स्थानबद्ध करून ठेवलं होतं, त्याबद्दल आम्ही बोलत होतो; पण या गोष्टींमुळे मी कम्युनिस्ट कशी काय ठरू शकते? मात्र एफ.बी.आय.च्या मतानं तसं होतं. म्हणूनच त्या भयंकर एजंटनी माझ्या वडलांना सांगितलं की, कुणाही एका कम्युनिस्ट किंवा कम्युनिस्टधार्जिण्या व्यक्तीचं नाव सांगितलंस, तर आम्ही तुला मुक्त करू. जर मी त्या 'चायनीज स्टुडन्ट्स डेमॉक्रेटिक ख्रिश्चन असोसिएशन'ची सभासद झाले नसते, तर एफ.बी.आय.नं त्याचा उपयोग करून माझ्या वडलांना इतरांची नावं सांगायला दबाव आणला नसता. मुख्य म्हणजे 'हिचं नाव सांग' म्हणून आग्रह धरला नसता. माझ्या वडलांनी कधीही पोलिसांना माझं नाव सांगितलं नसतं. त्यामुळे त्यांच्याकडे फक्त एकच पर्याय उरला होता. ते दृश्य मी जन्मात कधी विसरू शकणार नाही. माझ्या वडलांचा देह फासाला लटकलेला होता आणि माझी आई त्यांच्या पायांना मिठी घालून असहायपणे त्यांचं मृत शरीर खाली उतरवण्याचा निष्फळ प्रयत्न करत होती. या आत्महत्येला मी कारणीभूत ठरले होते, याबद्दल मी स्वत:ला कधीही माफ करू शकले नसते.

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

‘trial by silence’ या इंग्रजी
कादंबरीचा अनुवाद




अर्धनारी

‘आलवायन’ या तामिळ
कादंबरीचा अनुवाद




एकाकी सुगी

**पेरुमाल मुरुगन**

अनुवाद


**डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**

---

तथाकथित नैतिकतेला छेद देणारं लोकजीवनातलं धक्कातंत्र अलगद
वाचकांपुढे सादर करणारी सशक्त कादंबरीमाला

**किंमत प्रत्येकी : २७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकाच्या पानांतून




# लोकमान्य टिळक दर्शन

**भा. द. खेर**

*'सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?' अशी गर्जना करणारा 'केसरी'... डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या बीजारोपणात महत्त्वाची भूमिका बजावणारा शिक्षणमहर्षी... 'गीतारहस्य' लिहिणारा कर्मयोगी...गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवातून लोकांना संघटित करणारा द्रष्टा नेता... लोकमान्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं तेजस्वी दर्शन*

## सूर्य तपाचे फळ



दि. २३ जुलै १८५६. सकाळचा रम्य समय. सूर्योदयानंतर दोन घटका पार पडल्या; आणि रत्नागिरी शहरात एका मुलाचा जन्म झाला. हा मुलगा मोठेपणी आपल्या कर्तृत्वाने एका महान साम्राज्याला कंपित करणार आहे याची त्या वेळी कोणाला कल्पनाही नसेल. चंडप्रतापी सूर्याच्या प्रसादाने जन्मलेले हे बालक ब्रिटिशांच्या साम्राज्यावरील

कधीही न मावळणाऱ्या सूर्याला अस्तंगत करणार आहे याची कोणाला गंधवार्ताही नसेल.

१८५६ हे साल फार धामधुमीचे होते. बदल हा सृष्टीचा धर्म आहे ही गोष्ट त्या काळाने जगाला पुरेपूर पटवून दिली होती. जुन्या गोष्टी पटापट पालटत होत्या आणि नव्या गोष्टी त्यांची जागा घेत होत्या. १८१८ साली पेशवाई बुडाल्यानंतर ब्रिटिशांचे नवे राज्य सुरू झाले होते. आता त्याही राज्यात बदल होण्याची वेळ आली होती. पेटलेल्या परिस्थितीच्या काहिलीत सारा समाज खालपासून वरपर्यंत ढवळून निघत होता. समाजाचे पूर्वीचे सारे स्वरूप पालटून गेले होते. प्रत्यही नवे बदल घडत होते. काही संस्थाने नामशेष झाली होती; काही संस्थाने त्या पंथाला लागली होती आणि काही संस्थानांचे साध्या जमीनदारीत रूपांतर झाले होते. तंजावर, सातारा, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदे इत्यादी संस्थानांत तर नुसती आग पेटली होती. जनतेला नि:शस्त्र करण्यात येत होते. सैनिकी पेशाच्या लोकांच्या नोकऱ्या जात होत्या. मध्यमवर्गीय बेकार होत होते. व्यापाऱ्यांची दिवाळी निघत होती. कारागिरांना काम मिळत नव्हते. विद्वान पंडितांना राजाश्रय मिळत नव्हता आणि भिक्षुकीचा व्यवसाय तर पुरताच बसला होता. त्यामुळे साहजिकच शेतीवर उपजीविका करण्यासाठी हजारो लोक शेतीकडे वळले; पण त्या सर्वांचे पोट भरण्याइतके उत्पादन शेतीत होणे शक्य नव्हते. साऱ्यांचाच भार भूमी कसा सहन करणार? सारांश, देशातील सर्व वर्गांचे लोक-सारी जनता, गरीब-श्रीमंत, राजे-रजवाडे सारे सारे या बदलत्या परिस्थितीत भरडून निघत होते.

या साऱ्या परिस्थितीचा परिपाक १८५७च्या उठावात झाला. १८५६च्या जुलै महिन्यात लॉर्ड कॅनिंग यांनी एक आज्ञा काढली. जे सैनिक आदेश मिळताच कोठेही चालून जाण्यास तयार होणार नाहीत त्यांना सैन्यात प्रवेश देऊ नये, असे त्या आज्ञापत्रात म्हटले होते. त्याच सुमाराला अशी अफवा पसरली होती की साऱ्या हिंदी शिपायांना बाटवून ख्रिस्ती करण्यासाठी व्हिक्टोरिया राणीने लॉर्ड कॅनिंग याची नेमणूक केली आहे. सारा देश बाटवून ख्रिस्ती करण्याची ही पहिली पायरी होय, अशी लोकांची साहजिकच समजूत होऊ लागली होती. त्याच वेळी ख्रिस्ती मिशनऱ्यांचा संचार देशात सुरू होता. आगगाड्या व आगबोटी यांची धावाधावही नुकतीच सुरू झाली होती. सामान्य जनतेने यावरून एकच निष्कर्ष काढला. इंग्लंड आणि हिंदुस्थान हे दूरस्थित

देश दळणवळणाच्या साधनांनी जवळ जवळ आणून हिंदू धर्मीयांना ख्रिश्चन करण्याचा ब्रिटिशांचा कावा आहे, अशी लोकांची समजूत झाली. केवळ याच कारणासाठी ख्रिस्ती धर्मोपदेशक सर्वत्र संचार करीत आहेत, असेही लोकांना वाटू लागले.

याच वेळी विधवा-विवाहावरील सारी बंधने दूर करणारा कायदा संमत करण्यात आला. हा तर हिंदू धर्मावर एक प्रकारे आघातच होता. त्याच वेळी एक भविष्य वर्तविले जात होते. १७५७ साली क्लाइव्हने प्लासीच्या रणक्षेत्रावर मिळविलेल्या यशाची १८५७ साली शंभरी भरणार असल्याचे लोक बोलत होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराचा शेवट होणार आहे, देशात ठिकठिकाणी पूर येणार आहे आणि सर्वत्र कॉलऱ्याची साथ फैलावणार आहे, असे भविष्य सांगितले जात होते. अर्थात हे सारे भविष्य थोड्याफार फरकाने पुढे खरे ठरले, ही गोष्ट वेगळी!

पेशव्यांचे वारसदार नानासाहेब यांनी आणि इराणच्या राजाच्या हस्तकांनी त्याच वेळी ब्रिटिशांच्या राज्याविरुद्ध धूमधडाक्याने प्रचार सुरू केला होता.

अशा या ज्वालाग्राही वातावरणात, अशांततेच्या परिस्थितीत टिळकांचा जन्म झाला.

सुमारे एकशेसोळा वर्षांपूर्वी रत्नागिरीला गंगाधरपंत टिळक या नावाचे एक शिक्षक राहत होते. त्यांच्या पत्नीचे नाव पार्वतीबाई. गंगाधरपंतांना तीन मुलीच होत्या. पुत्ररत्नप्राप्तीचा योग आला नव्हता. पार्वतीबाई देवभोळ्या होत्या. पुत्रप्राप्तीसाठी त्यांनी कडक सूर्योपासना सुरू केली. ती तपस्या करताना त्यांनी आपल्या कृश शरीराकडेही लक्ष दिले नाही. सतत एकच ध्यास आणि सूर्योपासना! अखेरीस त्यांची ही तपस्या फळास आली. त्या दिवशी सकाळी कोणता सुमुहूर्त होता कोणास ठाऊक! ज्या प्रात:काळी परमेश्वराची पूजा बांधली जाते आणि मंदिरातील घंटांचा शुभदायक ध्वनि कानी पडत असतो अशा वेळी पुत्राने जन्म घ्यावा यापेक्षा दुसरा सुमुहूर्त तो कोणता?

या मुलाच्या पणज्याचे आणि कुलदैवताचे नाव केशव. हेच नाव त्या मुलाला ठेवले गेले. पुढे आई त्याला 'बाळ' या लाडक्या नावाने हाक मारू लागली. केशव नाव लुप्त झाले आणि लोकव्यवहारात बाळ हे नाव रूढ झाले. बाळ गंगाधर टिळक हे नाव आज स्वातंत्र्याचा महामंत्र म्हणून उच्चारले जाते. 'बाळ' या त्यांच्या नावासंबंधाने टिळक एकदा असे म्हणाल्याचे सांगतात,

'आमची मातु:श्री तपस्विनी होती. पुत्रप्राप्तीस्तव तिने वर्ष दीड वर्ष सूर्याराधनेचे खडतर तप केले होते. तिने प्रेमाने जे नाव ठेवले व जे आज सर्वांनी प्रचारात आणले, तेच मी उपयोगात आणू लागलो.'

मुलाच्या जन्मानंतर हिंदू धर्म पद्धतीनुसार पाचवीची, सहावीची पूजा झाली. शांतिपाठ झाले. बारसे झाले. सारे सारे गोड सोहळे पार पडले. ते पार पडत असताना टिळकांच्या घरात तीन मुलींनंतर मुलगा झाला एवढ्यापुरताच आनंद सर्वांना होत होता; पण प्रेमाने म्हणा अगर अंत:साक्षीने म्हणा मुलाच्या भावी मोठेपणाबद्दल मातेला मात्र एक प्रकारचा विश्वास वाटत होता. या गोष्टीचे कारण अर्थात वेगळे होते. पुत्रप्राप्तीसाठी पार्वतीबाईंनी खडतर तपश्चर्या केली होती. सूर्यापासून वरदान मागितले होते. पुत्राच्या रूपाने सूर्याने ते वरदान दिले होते. सूर्याचे वरदान सूर्यासारखेच तेजस्वी, सूर्यासारखेच महाप्रतापी ठरणार नाही का? 'माझा मुलगा सूर्यासारखाच होणार' या विश्वासाने त्या माउलीच्या अंत:करणात ठाण मांडले होते.

दापोली तालुक्यातील चिखलगावची खोती टिळक घराण्याकडे होती. या टिळक घराण्यातले लोक काहीसे एककल्ली होते. त्यांचा दृष्टिकोन सर्वस्वी स्वतंत्र असे. काहीसा नित्याचा जनमार्ग सोडूनही! टिळकांचे पणजोबा केशवराव घोड्यावर बसण्यात निष्णात, निशाण मारण्यात पटाईत, पोहण्यात सराईत आणि स्वयंपाकात तरबेज होते. पेशव्यांच्या पदरी त्यांना चांगली नोकरी होती; पण १८१८ साली पेशवाई बुडाली आणि त्यांनी नोकरीला रामराम ठोकला. परकीयांच्या राज्यातील नोकरी करायचे त्यांनी साफ नाकारले.

केशवरावांचे चिरंजीव रामचंद्रपंत हे बुद्धीने चलाख, पण स्वभावाने एककल्ली आणि काहीसे बेफिकीर होते. पुण्याला कॉलरा सुरू झाला आणि त्यात त्यांची पत्नी दगावली. वैराग्य येऊन स्वारी जी प्रवासाला निघाली ती थेट काशी गाठली. अर्थात कुटुंबाची सारी जबाबदारी त्यांचे चिरंजीव गंगाधरपंत यांच्यावर येऊन पडली.

रामचंद्रपंतांनी जसे अचानक घर सोडले तसेच एके दिवशी अचानक ते घरी येऊन दाखल झाले. नातवाला बघून त्यांना कृतकृत्य वाटले. आपल्या नातवाच्या आयुष्यावर त्यांनी चांगलाच ठसा उमटविला. त्यांनी त्याला लिहिण्यावाचण्यास शिकविले. त्याला शिकवीत असताना या आपल्या नातवाची बुद्धी तल्लख आहे, ही गोष्ट आजोबांच्या तेव्हाच ध्यानात आली. एखाद्या

आम्रवृक्षाच्या सावलीला बसावे आणि नातवाला धडे द्यायला रामचंद्रपंतांनी सुरुवात करावी; पण धडे घ्यायचे काम मध्येच बंद पडावे आणि निराळाच उपक्रम सुरू व्हावा असे नेहमी होई. मोठ्या अभिमानाने आजोबांनी नातवाला गोष्टी सांगण्यास प्रारंभ करावा. अभिमानाने सांगण्याजोग्या अशा गोष्टी त्यांच्याजवळ दुसऱ्या कोणत्या असणार? १८५७ साल त्यांनी समक्ष पाहिले होते. देशभर पेटलेला वणवा त्यांनी प्रत्यक्ष अवलोकन केला होता. त्या वेळच्या असंख्य वीरकथा त्यांनी ऐकल्या होत्या, पाहिल्या होत्या. त्याच गोष्टी आजोबा नातवाला सांगत. नातवाची नजर समोरच्या समुद्रावर खिळलेली असे, पण त्याचे कान मात्र आजोबांच्या गोष्टींकडे लागलेले असत. नातवाने त्या गोष्टी ऐकल्या; पण केवळ त्या ऐकून वाऱ्यावर विरल्या असे झाले नाही, तर नातवाच्या अंत:करणात जाऊन त्या रुजल्या, आणि नातवाच्या पुढील आयुष्यात त्यांचा आविष्कारही झाला. रामचंद्रपंत कोकणातल्या घरी काही दिवस राहिले. मग पुन्हा त्यांनी काशीला धूम ठोकली ती कायमचीच! तेथे जाऊन त्यांनी संन्यास घेतला आणि १८७२ साली तेथेच ते समाधिस्थ झाले; पण जाता जाता आजोबांनी नातवाच्या अंत:करणावर देशभक्तीची ठिणगी ठेवली आणि नातवाचे अंत:करण पुढे देशभक्तीने पेटून उठले.

टिळकांचा जन्म झाला तेव्हा गंगाधरपंतांना अवघा पंचवीस रुपये पगार होता. पदरी मोठे कुटुंब होते. त्या पगाराला ग्रंथनिष्पत्तीची जोड देऊन आणि यात थोडाबहुत पैसा मिळवून त्यांनी आपला संसार नेकीने केला. हळूहळू नोकरीत बढती मिळून गंगाधरपंत असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर होऊन १८६६ साली पुण्याला आले. पुण्याला आल्यानंतर पार्वतीबाईंनी फार दिवस काही संसार बघितला नाही. १८६६ साली आपल्या मुलाला पतीच्या हवाली करून त्या निघून गेल्या. त्या वेळी टिळकांचे वय उणेपुरे दहा वर्षांचे होते. पार्वतीबाई मोठ्या भाविक होत्या. त्यांची प्रकृती मुळातच धडधाकट नव्हती. त्यात त्यांच्या उपासतापासांची आणि व्रतवैकल्यांची भर पडली. खडतर तपस्येने माउलीचे शरीर खंगत गेले आणि अगदी लहान वयात टिळक मातृसुखाला आचवले. एका संस्कृत कवितेत टिळकांनी या माउलीचे गुणगान करून ठेवले आहे.

१८७२ साली गंगाधरपंतांनी इहलोकीची यात्रा संपवली. त्या वेळी टिळकांचे वय १६ वर्षांचे होते. रत्नागिरीला कलेक्टर क्रॉफर्डसाहेबांनी सुरू केलेल्या

सॉ-मिलमध्ये गंगाधरपंतांचे एक हजार रुपये बुडाले तरी मृत्युसमयी त्यांनी पाच हजार रुपये मागे ठेवले होते. तेवढा आधार त्यांच्या मुलाला पुरेसा होता. गंगाधरपंतांच्या मृत्यूनंतर टिळकांच्या संगोपनाचा सारा भार त्यांच्या चुलत्यावर येऊन पडला. चुलत्याबद्दल पुतण्याला भारी आदर वाटत असे आणि चुलत्याला पुसल्याविना पुतण्या कोणतेही काम करीत नसे.

पंधराव्या वर्षी टिळकांचे लग्न झाले. त्यावेळी ते इंग्रजी शाळेत शिकत होते. टिळकांच्या पत्नीचे माहेरचे नाव तापीबाई होते. माहेरची तापीबाई सासरची सत्यभामा झाली. कोकणातील बाळ घराण्यातील ही मुलगी. हे घराणे मोठे प्रतिष्ठित आणि दानशूर होते. त्यांच्या दातृत्वाची एक मजेदार हकिगत सांगतात. एकदा एक भिकारी दारात येऊन भिक्षा मागू लागला. तापीबाईंच्या आईने पोत्यातून ओंजळभर तांदूळ काढले आणि त्या भिक्षेकऱ्याच्या झोळीत टाकले. त्या तांदळाबरोबर चुकून एक सोन्याचा दागिना गेला. पूर्वी चोराचिलटांच्यापासून रक्षण व्हावे म्हणून दागदागिने पेटीत न ठेवता धान्याच्या पोत्यातून लपवून ठेवीत असत; पण बाळांनी तो दागिना परत न घेण्याबद्दल आपल्या पत्नीला बजावले. एकदा भिक्षा वाढली म्हणजे ती परत घेऊ नये, या शास्त्रानुसार त्यांनी तो दागिना परत मागितला नाही. 'तो दागिना भिक्षेकऱ्याच्या नशिबात होता; आणि तुझ्या हातून हा धर्म व्हावा अशी परमेश्वराचीच इच्छा होती,' असे बाळांनी आपल्या पत्नीला सांगितले.

टिळक शाळेत असताना फारसे सुखाने नांदले नाहीत. त्यांचा स्वभाव काहीसा खोडकर होता. त्यात पुन्हा स्वतंत्रपणाची झाक होती. त्यांच्या पुढारलेल्या मतांबद्दल आणि खोडकरपणाबद्दल मास्तरांची घरी तक्रार येत असे. एकदा एक मजेदार प्रसंग घडला. मास्तर वर्गाबाहेर असताना काही मुलांनी शेंगा खाल्ल्या आणि शेंगांची टरफले वर्गात टाकली. मास्तर परत आले तेव्हा वर्गातले दृश्य पाहून साहजिकच रागावले. ''वर्गात ही घाण कोणी केली?'' असा प्रश्न त्यांनी साऱ्या वर्गाला उद्देशून विचारला; पण गुन्हा कबूल करतो कोण? तेव्हा मास्तरांनी साऱ्या वर्गाला छडी मारण्याचा उपक्रम सुरू केला. छडी मारता मारता टिळकांची पाळी आली. छडी खाण्यासाठी हात पसरण्यास त्यांनी साफ नकार दिला. ते म्हणाले, ''मी काही ही घाण केलेली नाही. मग मला शिक्षा का?'' मग मास्तरांनी टिळकांना ती घाण करणाऱ्याचे नाव विचारले; पण तेही सांगण्यास टिळकांनी साफ नकार दिला. चुगली करणे

त्यांच्या रक्तातच नव्हते.

वर्गाची शिस्त किंवा वर्गात अभ्यास करण्याची एक विशिष्ट पद्धत टिळकांनी कधी पाळली नाही. मास्तरांनी वर्गात गणित घातले तर त्याचे उत्तर पाटीवर नको का लिहायला? पण गणित घातले की टिळक लगेच ओरडून गणिताचे उत्तर सांगत. या गोष्टीत टिळकांची हुशारी दिसे; पण शिस्त मात्र दिसत नसे. मास्तरांनी गणिताची रीत कुठे आहे म्हणून विचारावे तर या विद्यार्थ्याने आपल्या डोक्याकडे बोट दाखवावे. मास्तरांना हा उद्धटपणा वाटे; परंतु टिळकांची प्रगल्भ बुद्धीच या गोष्टीत दिसून येई. गणितात त्यांची गती फार पुढे गेलेली होती; परंतु खेडेगावातल्या शाळामास्तराला ती आकलन होणे शक्य नव्हते. टिळकांचे वडील चांगले गणिती होते. त्यांनी आपल्या मुलाला जवळ बसवून त्याच्याकडून सगळी गणिते करून घेतली होती. वडिलांच्या हाताखाली शिक्षण घेतल्यामुळे टिळकांच्या जन्मजात बुद्धिमत्तेत अधिकच भर पडत चालली होती. अशा बुद्धिमान, प्रगल्भ विद्यार्थ्याला सोडवायला पाटी कशाला हवी होती?

संस्कृत आणि मराठी या विषयांची गोडीही टिळकांना वडिलांनीच लावली. तीव्र स्मरणशक्ती असल्याने अगदी लहानपणीच कित्येक श्लोक टिळकांनी मुखोद्‌गत केले होते. एकदा गंगाधरपंत बाणभट्टाच्या कादंबरीचा काही भाग वाचीत होते. शेजारीच बसून टिळक लक्षपूर्वक ऐकत होते. कादंबरीतल्या सुंदर काव्यमय प्रसंग-वर्णनांनी टिळकांचे मन आकृष्ट केले. हे पुस्तक पहिल्यापासून वाचलेच पाहिजे, असे त्यांना वाटू लागले आणि त्यांनी वडिलांकडे पुस्तक मागितले. मुलाच्या या मागणीने गंगाधरपंतांना आनंद झाला आणि आश्चर्यही वाटले. इतक्या लहान मुलाला कादंबरी समजेल की नाही अशी शंकाही त्यांना आली; पण तसे सांगून मुलाला नाराज करण्याचे त्यांच्या जिवावर आले. म्हणून त्यांनी एक तोड काढली. गणितातला एक बराच अवघड प्रश्न त्यांनी टिळकांना घातला आणि हे गणित सोडवले तर पुस्तक मिळेल असे त्यांनी सांगितले. टिळक मोठ्या उत्साहाने गणित सोडवायला बसले आणि दीड तासाच्या प्रयत्नानंतर ते गणित सुटले. गंगाधरपंतांनी आनंदाने आणि अभिमानाने बाणभट्टाची कादंबरी मुलाच्या हातात ठेवली.

१८६६ साली टिळकांचे नाव पूना सिटी स्कूलमध्ये घातले. तेथे त्यांनी दोन वर्षांत तीन इयत्ता पूर्ण केल्या. बंडखोर वृत्तीमुळे या शाळेत असतानाही

त्यांचे शिक्षकांशी कधीच पटले नाही. एकदा संस्कृतच्या तासाला त्यांची शिक्षकाबरोबर जोरदार शाब्दिक चकमक झाली. शिक्षकाने साहजिकच मुख्याध्यापकांकडे तक्रार केली. मुख्याध्यापक शिस्तीचे भोक्ते! शिक्षकांशी विद्यार्थ्याने वाद करणे हे त्यांच्या शिस्तीत बसत नव्हते. त्यांनी या प्रकरणात अर्थातच शिक्षकाची बाजू घेतली. स्वाभिमानी टिळकांना हा अपमान सहन झाला नाही. त्यांनी ती शाळा सोडली आणि दुसऱ्या शाळेत आपले नाव दाखल केले; पण त्या मुख्याध्यापकांनी शाळा सोडताच टिळक परत पूना सिटी स्कूलमध्ये शिकायला आले.

कॉलेजात गेल्यावर सुद्धा टिळकांनी आपली अभ्यासाची पद्धत सोडली नाही. ते टिपणे कधीच काढत नसत. अभ्यासासाठी जागरण करणे हे त्यांच्या अभ्यास-पद्धतीत बसत नव्हते. घाईघाईने ते रोजचा अभ्यास करीत आणि त्यातही त्यांचे फारसे लक्ष नसे; पण एखादी गोष्ट करायचा निर्धार केल्यावर मात्र ते ती मनापासून करीत. एकदा प्राध्यापक जिनसीवाले यांनी संस्कृत काव्याची एक स्पर्धा लावली. स्पर्धेचा विषय होता 'मातृविलापः'. टिळकांनी या स्पर्धेत भाग घेतला आणि त्यांनी रचलेले काव्य सर्वोत्कृष्ट ठरले. लहानपणीच निर्माण झालेली संस्कृतची गोडी कॉलेज-जीवनापर्यंत टिकली होती. टिळकांनी त्या काळात बरेच संस्कृत काव्य रचले होते; पण कॉलेज-जीवन संपल्यानंतर मात्र ते काव्याच्या वाटेला कधीच गेले नाहीत.

टिळकांची शिक्षणातील गती एकसारखी वाढतच राहिली. विद्यार्थीदशेत त्यांनी अफाट वाचन केले; पण अडचण एवढीच होती की, शाळेत अभ्यासासाठी नेमलेली पुस्तके सगळीच्या सगळी वाचून होतील या गोष्टीची खात्री नसे. त्यामुळे प्रत्यक्ष राजकारणाच्या रणधुमाळीत जसा त्यांना पहिला वर्ग प्राप्त झाला तसा शाळेतील परीक्षेत पहिला वर्ग मिळाला नाही. पहिला वर्ग मिळविण्याची त्यांची पात्रता नव्हती असे थोडेच होते? पण परीक्षा देण्याची त्यांची पद्धत जगावेगळी असे. सर्वसामान्य विद्यार्थी सोप्या प्रश्नांना प्रथम हात घालतात आणि अवघड प्रश्नांकडे नंतर बघतात. टिळकांची पद्धत नेमकी उलट असे. प्रश्नपत्रिका हाती पडली म्हणजे नेमके अवघड प्रश्न हुडकून ते प्रथम सोडवायचे आणि सोप्या प्रश्नांकडे वळायचे नाही. जणू सोपे प्रश्न सोडविण्यासाठी टिळकांचा जन्मच नव्हता. त्यांचे सारे आयुष्यच अवघड प्रश्न यशस्वी रीतीने सोडविण्यात गेले. ते सारे प्रश्न राजकारणाचे असल्यामुळे त्यांना त्यात नेमका

पहिला वर्ग मिळाला; पण शाळेतील जीवनात परीक्षेतील प्रश्न वगळणाऱ्या विद्यार्थ्याला पहिला वर्ग कोण देणार? नाही म्हणायला मित्रांच्या आग्रहाखातर एकदा त्यांनी परीक्षेत सगळ्या प्रश्नांकडे लक्ष पुरविले आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. ते बी.ए.ला पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले.


१८७२ साली टिळक मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि डेक्कन कॉलेजात त्यांनी प्रवेश केला. कॉलेजात असताना ते तेथील वसतिगृहात राहत. त्यांची प्रकृती मुळात धडधाकट नव्हती. बहुधा आईच्या प्रकृतीचा वारसा त्यांच्याकडे आला असावा. कॉलेजमध्ये गेल्यावर एक वर्षभर आपल्या प्रकृतीकडे लक्ष द्यायचा त्यांनी निर्धार केला. ते कुस्ती करू लागले. बोट वल्हवू लागले. पोहण्याचाही सपाटा त्यांनी चालू ठेवला. दूध पिऊन ते नियमाने व्यायाम करू लागले. धूम्रपान ते कधीही करीत नसत. त्यांना व्यसन असे कोणतेच नव्हते. वस्तुत: त्या वेळी विद्यार्थ्यांमध्ये धूम्रपानाचा चांगलाच रिवाज होता; पण टिळक तिकडे वळले नाहीत. कॉलेजात असताना त्यांना व्यसनच म्हटले तर चहाचे होते. सुपारीही ते खात. पुढे तर ही सुपारी त्यांची सहचारिणी बनली.

शरीरप्रकृतीकडे लक्ष पुरवायचे ठरल्यानंतर त्यांनी ते जसे मनोभावाने पुरविले तसेच त्या वर्षी त्यांनी अभ्यासाकडे मनोभावे दुर्लक्ष केले. त्यामुळे कॉलेजची पहिली परीक्षा त्या वर्षी त्यांच्या हातून निसटली; पण त्या वर्षी जी सुदृढ प्रकृती त्यांच्या हाती लागली तिने अखेरपर्यंत त्यांच्यावर उपकार केले. पुढील आयुष्यात त्यांच्यावर दु:खाचे डोंगर कोसळले, दारुण कारावास त्यांना भोगावे लागले आणि देशासाठी त्यांना अविश्रांत श्रम करावे लागले. त्यांची प्रकृती सुदृढ नसती तर या साऱ्या देहयातना सहन करणे त्यांना शक्य झाले असते काय? अभ्यासाचे एक वर्ष वाया गेले ही गोष्ट खरी, पण त्या वर्षात आयुष्यभर पुरेल एवढे प्रकृतीचे भांडवल त्यांनी हस्तगत केले.

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# असा लुटला भारत




**रॉय मॉक्झॅम** । अनुवाद **सरिता आठवले**


भारतीय बाजारपेठेवरील वसाहतवाद्यांचं आक्रमण...तीन शतकांच्या धगधगत्या इतिहासावर प्रकाशझोत टाकणारं संशोधन

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

सुधारित दुसरी आवृत्ती


# इथे थबकली गंगामाई

**मनोहर माळगांवकर**
अनुवाद
**श्री. ज. जोशी**




पन्नास वर्षांहून अधिक काळ वाचकांना मोहित करणारी मनोहर माळगांवकर यांची अभिजात साहित्यकृती... संक्रमणावस्थेत असलेल्या राष्ट्राची महाकथा...

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# सं·जी·व·न

## भा. द. खेर

*लोकांनी छळ केल्यावरही ज्यांच्या मनात विश्वाचे आर्त प्रकाशले...ज्यांच्या मुखातून लोकोद्धारासाठी 'ज्ञानेश्वरी'रूपी अमृत पाझरले...ज्यांनी पसायदानातून 'जो जे वांछिल तो ते लाहो' असा आशीर्वाद दिला...त्या ज्ञानदेवांच्या चरित्राचा संजीवक पुन:प्रत्यय...*

### बदल हा सृष्टीचा धर्मच!



त्या तेजस्वी तरुणानं आळंदी क्षेत्राच्या शिवेवर पाऊल टाकलं तेव्हा पूर्व क्षितिजावरून साक्षात सूर्यदेवानं त्या तरुणाला पहिली वंदना दिली. त्या स्वागतसोहळ्याचा सुगावा त्या क्षणी कुणालाही लागला नाही. त्या तरुणालाही तो अजब स्वागतसोहळा समजला नाही.

त्या वेळी त्या उगवत्या सूर्यदेवालाच सगळीकडून वंदन केलं जात होतं. उगवत्या सूर्याला वंदन करणं हा तर साऱ्या सृष्टिजातीचा स्वभावधर्म! त्यानुसार इंद्रायणीच्या शांत जलाशयावरही

सूर्यदेवाच्या वंदनाचा सोहळा सुरू झालेला दिसत होता. सूर्याची सोनेरी किरणं त्या जलाशयावर पडली होती. त्यामुळे जलाशयाच्या विशाल तबकात असंख्य निरांजने तेवल्यासारखी वाटत होती आणि देवी इंद्रायणी जगदंबेचं रूप घेऊन सूर्यदेवाला ओवाळत आहे, असा भास होत होता.

त्या तेजस्वी तरुणानं आळंदी क्षेत्राची शीव ओलांडून चार पावलं टाकली. परंतु कुणीही त्याची दखल घेतली नाही. पुराणांतरी प्रसिद्ध असलेलं आळंदी हे शिवतीर्थ या तरुणाच्या पदस्पर्शानं कालांतरानं विश्वविख्यात विष्णुतीर्थ होणार आहे हे सत्य त्या क्षणी तरी अज्ञानात दडलेलं होतं. त्यामुळे त्या तरुणाची विचारपूस कोण करणार? कुणी कच्छपी लागावं असं महत्त्व त्याला आज तरी प्राप्त झालेलं नव्हतं.

परंतु आळंदीत गणेश महाजन या नावाचा एक स्वयंघोषित स्वयंसेवक होता. वाहणाऱ्या वाऱ्याला थांबवून त्याची विचारपूस करण्याची त्याची सवय होती. क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येकाला तो हटकत असे. त्याला क्षेत्रातील माहिती देत असे आणि त्याची माहिती विचारीत असे. हा त्याचा गुणही नव्हता आणि दुर्गुणही नव्हता. ती त्याला लागलेली सवय होती.

गणेश महाजन इंद्रायणीवर प्रात:कालच्या स्नानाला निघाला होता. मार्गात हा तेजस्वी तरुण दिसताक्षणीच हातातली कपड्याची पिशवी सावरत त्यानं विचारलं, ''आपण कोणत्या गावाचे? काय करता? या क्षेत्री येण्याचं प्रयोजन?''

त्या तरुणानं सांगितलं, ''मी आपेगावाच्या कुलकर्ण्यांचा एकुलता एक मुलगा. मी यात्रेकरू आहे. यात्रा करीत या क्षेत्री आलो.''

''कुणाकडे जायचं?''

''एखाद्या देवळात कुठे उतरण्याची सोय असेल तर हवी!''

गणेशानं त्याच्या नेहमीच्या परखड पद्धतीनं बजावलं, ''आपण कुलकर्ण्यांच्या घरचे! म्हटलं इथेही उतरण्यासाठी कुलकर्ण्यांचं घर आहे. एका गावाचे नव्हे, तर चोवीस गावांचे सिद्धोपंत हे कुलकर्णी आहेत! खुशाल त्यांच्याकडे उतरा! मी सांगतो ना!''

तो तरुण नम्रतेनं म्हणाला, ''सांप्रत मी यात्रिक आहे. गृहस्थाकडे उतरणं प्रशस्त वाटत नाही!''

''पण मला वाटतं ना प्रशस्त! अहो, आमचे सिद्धोपंत म्हणजे या गावाचं वैभव! आदरातिथ्य तर काही विचारू नका! कुबेरालाही खाली बघावं लागेल!''

''ते मला मान्य आहे; पण यात्रिकानं एखाद्या देवळाचा आश्रय घ्यावा हे बरं नाही का?''

गणेशाची चर्पटपंजरी चालूच, ''अहो, आमचं हे शिवक्षेत्र आहे; परंतु आमच्या सिद्धोपंतांनी डोईवर पागोटं चढवलं आणि उभं गंध लावलं म्हणजे साक्षात विष्णूचं रूप दिसतं! अगदी पंढरीचा थेट पांडुरंग! फक्त कटीवर हात ठेवण्याचाच अवकाश!''

यावर तो तरुण काही बोलणार एवढ्यात गणेशाची सिद्धोपंतस्तुती पुढे चालू झाली, ''अहो, त्यांचा गायीगुरांचा भलामोठा गोठा बघितलात तर त्यांच्या विशाल वाड्याची तुम्हाला कल्पना करता येईल! तेव्हा आपण तिथे वास्तव्य करावं हे बरं!''

तो विषय बदलण्याच्या हेतूनं त्या तरुणानं विचारलं, ''आपण पंढरपुरी पांडुरंगाचं दर्शन घेण्यासाठी गेलाच असाल!''

''मी कशाला पंढरीला जाऊ? माझं इथलं काम कोण करणार?''

''काय काम करता इथे?''

''खरंच! ते सांगायचं राहिलंच की! आमचं नाव महाजन. माझ्या वडिलांचा इथे भिक्षुकीचा व्यवसाय आहे. सारं गाव त्यांना गुरुजी म्हणतं. मी त्यांचा मुलगा. मला सारं गाव गणेशा म्हणतं.''

''पण आपला व्यवसाय नाही सांगितलात?''

''ते राहून गेलं खरं! मी वडिलांच्या व्यवसायात त्यांना मदत करतो. म्हणजे साधीसुधी भिक्षुकीची कामं! वटपौर्णिमेला आयाबायांना सावित्रीचं व्रत सांगतो. वटवृक्षाला दोरा गुंडाळतो. इथले वटवृक्ष बघितलेत का? त्यांच्याभोवती गुंडाळण्यासाठी दोऱ्याची बंडलच्या बंडलंच लागतात. वेळ काय थोडा जातो? मग शिवाय मंगळागौरी, हरतालिका, सत्यनारायण, गणेश चतुर्थी अशा वार्षिक पूजा असतात. त्या पूजा सांगतो. अशी एक का दोन, अनेक धर्मकृत्यं असतात. पंढरपूरला जायला वेळ आहे कुणाला?''

मग तो गोष्टीवेल्हाळ गणेशा एकदम म्हणाला, ''पण आपलं नाव नाही सांगितलंत?''

''मला विठ्ठलपंत म्हणतात.''

''ते बरोबरच आहे. कुलकर्णीपण आहे ना आपल्या घराण्यात! आपल्याला एकेरी नावानं कसं संबोधता येईल?''

''या यात्रिकाला आपण विठ्ठल म्हणा! पण मला इथल्या वास्तव्यासाठी एखादं मंदिर सांगा!''

''म्हणजे आपण आमच्या सिद्धोपंतांच्या वाड्यात उतरणार नाही? अहो, साक्षात लक्ष्मी नांदते आहे त्या घरात! त्यांची विठ्ठलवेडी सुकन्या रुक्मिणी हे तर साक्षात देवीचं रूप आहे. त्या देववाड्यात मी तुम्हाला घेऊन जातो. चला लगेच! बोलता बोलता फार विलंब झाला!''

''म्हणूनच म्हणतो की, आता मला एखाद्या मंदिरात घेऊन चला.''

मग ते दोघे चालू लागले. सूर्य आता बराच वर आला होता. गावातले दैनंदिन व्यवहार सुरू झाले होते.

चालताना गणेशा म्हणाला, ''इथे देवळं आहेतच. पण ब्राह्मणांना वास्तव्यासाठी इथे गावाच्या एका बाजूला मठही आहे. तो मठ आहे धर्ममार्तंडांचा! ती मंडळी ब्राह्मण वर्गाचा न्यायनिवाडा करतात. धर्मविषयक कोणत्याही प्रश्नाचा तिथे न्यायनिवाडा होतो आणि त्यांनी दिलेला न्याय कटाक्षानं पाळला जातो. तिथे आपली उतरण्याची सोय होईल.''

विठ्ठलपंत हसून म्हणाले, ''मला आता न्यायनिवाडा नको आहे. मला काही दिवस वास्तव्यासाठी सोयीचं ठिकाण हवं आहे!''

गणेशानं सांगितलं, ''आमच्या या क्षेत्रात अनेक सिद्धपुरुष होऊन गेले असं म्हणतात. या पुरातन गोष्टी मला काय माहीत असणार? इथले जुने लोक तसं म्हणतात म्हणून आम्हीही म्हणतो. पण तो प्रश्न वेगळा! प्रस्तुत काळी सांगायचं म्हणजे इथे त्या सिद्धपुरुषांच्या नावाचं बेट आहे. सिद्धेश्वर बेट! जवळच सिद्धेश्वर मंदिर आहे. अगदी एकांतात! तिथे तुम्हाला उतरता येईल!''

विठ्ठलपंत मनाशी म्हणाले, 'उगाच नमनासाठी घडाभर तेल गेलं!'

म्हणून अधिक काळ न गमावता ते म्हणाले, ''वा! फारच छान सोय झाली. चला तिकडे जाऊ!''

गणेशा म्हणाला, ''बोलण्यात थोडा उशीरच झाला आहे. मी प्रात:स्नानासाठी निघालो होतो ना! आता इंद्रायणीवर स्नानविधी उरकतो. सूर्याला चार अर्घ्यं देतो. मग सिद्धेश्वर मंदिरी जाऊ! काय? चालेल ना?''

''अगदी माझ्या मनीचं बोललात! मीही आपल्याबरोबर स्नानविधी उरकून घेतो. प्रश्नच मिटला!''

स्नानस्थळी आल्यावर गणेशा म्हणाला, ''हा आपला ब्राह्मण घाट! घाट

नसला तरी ब्राह्मणांचा हा स्नानाचा पाणवठा!''

''म्हणजे स्नानाचीही इथे वर्णव्यवस्था दिसते!''

''आपल्याला काय? इथे स्नान करा म्हणून सांगितलं की, तिथे स्नान करायचं! बाकी तोंड बंद! कृष्णदेवानंच हे चातुर्वर्ण्य निर्माण केले आहेत ना. आपणही श्रीकृष्णाशी सहमत असालच की!''

विठ्ठलपंत म्हणाले, ''श्रीकृष्णाशी मी सहमत आहे. परंतु चातुर्वर्ण्याशी मात्र नाही!''

''हे कसं काय? चातुर्वर्ण्य श्रीकृष्णानंच निर्माण केले ना? त्यानंच तसं सांगितलं नाही का?''

''नाही. श्रीकृष्णाच्या म्हणण्याचा विपर्यास झालेला आहे. पहिली गोष्ट श्रीकृष्णानं चातुर्वर्ण्याचा प्रथम उच्चार केलेला नाही. श्रीकृष्णानं त्याचा केवळ पुनरुच्चार केलेला आहे.''

गणेशा त्यांच्याकडे विस्मयानं बघत असताना विठ्ठलपंत म्हणाले, ''चव्हाट्यावर त्या विषयाची चर्चा नको. ती चर्चा आपण सिद्धेश्वर मंदिरात शांतपणानं करू!''

मग थोडंसं थांबून विठ्ठलपंत पुढे म्हणाले, ''आता उभ्या उभ्या मी एवढंच सांगतो की, आपली नैसर्गिक पंचमहाभूतं चातुर्वर्ण्य मुळीच मानत नाहीत! पृथ्वी साऱ्याच माणसांना समान लेखते. सारीच तिची लेकरं! प्रत्येकाला पोटाशी घेते. त्या पृथ्वीवरच्या अंगावरचं पाणी साऱ्याच प्राणिमात्रांची तहान भागवतं. साऱ्यांनाच शुद्ध करतं. सूर्यदेव साऱ्यांना सारखा प्रकाश देतो. चंद्राला माझा प्रकाश शिवणार नाही असं म्हणतो का तो? त्या वायूमुळे सारे लोक श्वासोच्छ्वास करू शकतात. तो वायू कुणाची दमछाक करीत नाही. त्या आकाशाखाली सारेच प्राणिमात्र सुखावतात! त्या आकाशातूनच अखिल प्राणिमात्राला देवाचं पाणी प्राप्त होतं.''

गणेशा ते सारं ऐकून चकित झाला. म्हणाला, ''हा विचारच मनात कधी आला नव्हता. उगाच आजवर आम्ही शिवाशिव करीत बसलो!''

विठ्ठलपंत एकदम उद्गारले, ''साऱ्यांच्याच मनात ही शिवाशिव शिरलेली आहे. ती आज ना उद्या निघायला हवी! निघेलही!''

मग इंद्रायणीच्या जलाशयावर दृष्टी स्थिर करून ते पुढे म्हणाले, ''एकीमध्ये नेहमी शक्ती सामावलेली असते. कुठल्या तरी देवाच्या भक्तीच्या निमित्तानं

एखाद्या क्षेत्री सारा समाज एकत्र आला म्हणजे त्यांच्यातील भेदाभेद मावळून जातील. मग हा ब्राह्मण, हा शूद्र, हे अमंगल भेदाभेद आपोआप दूर होतील. मी आजवर ज्या यात्रा केल्या, त्या त्या स्थळी मला हे दृश्य दिसलं आहे! त्या त्या ठिकाणी मी असा एकसंध समाज बघितलेला आहे. देवाच्या भक्तीत अशी एकसंध शक्ती अंतर्भूत झालेली दिसते. हे देवाचं कार्य आहे!''

मग एकदम थांबून विठ्ठलपंत हसून म्हणाले, ''सकाळपासून आपली नुसती तोंडपाटीलकी चालली आहे. आता थोडा त्या देवाचा कामधंदा करू या!''

असं म्हणून त्यांनी स्नानविधी उरकला. सूर्यदेवाला अर्घ्य प्रदान केलं.

हे सारं झाल्यावर गणेशा म्हणाला, ''आपण मला चातुर्वर्ण्याबद्दल सांगणार आहात! नाहीतर ते राहून जाईल!''

विठ्ठलपंत बोलले, ''आता काही दिवस मी इथे राहणार आहे, खूप बोलता येईल!''

सिद्धेश्वराच्या मंदिरात विठ्ठलपंतांचा निवास सुरू झाला.

वैराग्यशील विठ्ठलपंतांना खरंतर गर्दीचं वावडं होतं. एकांतात त्या आदिशक्तींशी एकरूप होण्याची त्यांची देवलसी वृत्ती होती. परंतु आळंदीला आल्यापासून त्यांचं दर्शन घेण्यासाठी गावकऱ्यांनी सिद्धेश्वर मंदिरात एकच गर्दी केली. साखरेची वार्ता मुंग्यांना कुणी सांगावी लागत नाही.

दर्शनासाठी येणाऱ्या लोकांनी त्यांना शरीरस्वास्थ्याविषयी किंवा व्यावहारिक प्रश्न विचारावेत! विठ्ठलपंतांनी प्रत्येकाला सांगावं की, मी कुणी साधुपुरुष नाही किंवा ज्योतिषी नाही. साधा यात्रिक आहे. यात्रासंचार करताना इथेही या क्षेत्री आलो आहे. देवाला शरण जा. सारं काही ठीक होईल! शेवटी कर्ता करविता देवच आहे!

या दर्शनेच्छूंच्या गर्दीत गणेशाही एका बाजूला बसलेला असे. एके दिवशी त्याला उद्देशून विठ्ठलपंत म्हणाले, ''मी इथे आलो कशासाठी? आणि काय चाललंय हे?''

गणेशा हसला आणि म्हणाला, ''शेवटी कर्ता करविता देवच आहे ना? त्याच्या मनात असेल ते घडेल!''

ते ऐकून विठ्ठलपंतही हसायला लागले.

त्यांचं हसणं ओसरल्यावर गणेशा गंभीरपणानं म्हणाला, ''या तुमच्या गडबडीत माझा चातुर्वर्ण्याचा प्रश्न विसरला असाल; पण मी विसरलो नाही!''

‘‘मीही तो प्रश्न विसरलो नाही. माझी पाचव्या वर्षी मुंज झाल्यानंतर मी अध्ययनासाठी मातुलगृही पैठणला गेलो. तिथे वेदशास्त्रांचं अध्ययन केलं. तेव्हापासून तो प्रश्न माझ्या मनात घोळतो आहे. त्यानंतर ‘रामायण’, ‘महाभारत’ या पुराणग्रंथांचा मी अभ्यास केला. गीतापठण केलं, त्या वेळी ‘चातुर्वर्ण्य मया सृष्टम् गुणकर्म विभागश:’ हा गीतेतला श्लोक वाचनात आला.’’

मध्येच गणेशानं म्हटलं, ‘‘म्हणजे श्रीकृष्णच या चातुर्वर्ण्याचा प्रणेता आहे ना?’’

विठ्ठलपंत ठामपणानं म्हणाले, ‘‘मुळीच नाही! श्रीकृष्ण केवळ त्यांचा पुनरुच्चारकर्ता आहे!’’

‘‘हे नवीनच ऐकतो!’’

‘‘नवीन नाही हे! फार जुनं आहे. सविस्तर सांगतो!’’

असं म्हणून काही क्षण त्यांनी आपले नेत्र मिटून घेतले. चिंतन केलं आणि मग एकदम नेत्र विस्फारून ते बोलायला लागले, ‘‘महाभारत वाचत असताना अवचित माझ्यासमोर चातुर्वर्ण्य उभं ठाकलं. एक नवा प्रकाश बुद्धिमत्तेवर पडला तेव्हापासून! त्या प्रश्नाबद्दल माझं मत स्वस्थ बनलं आणि समाजमत त्या प्रश्नाबद्दल स्वस्थ बनावं असं वाटू लागलं. सारं सांगतो.’’

असं म्हणून त्यांनी महाभारतातील चातुर्वर्ण्याविषयीचा तो संदर्भ कथन केला.

गुणकर्माला अनुसरून मी चातुर्वर्ण्य निर्माण केले आहेत, असं श्रीकृष्णानं भगवद्गीतेत सांगून ठेवलं आहे. श्रीकृष्णाच्या या कथनात फक्त वर्णाचा उल्लेख आहे. जातींचा दुरूनदेखील उल्लेख नाही.

परंतु महाभारताच्या अनुशासन पर्वात उमा-महेश यांच्या संवादरूपानं चातुर्वर्ण्याचं सुस्पष्ट विवेचन केलेलं आढळतं.

महेशाला शंका विचारताना उमा म्हणते, ‘‘हे भगवान! पूर्वी ब्रह्मदेवानं चातुर्वर्ण्य उत्पन्न केले. तथापि, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या तिन्ही वर्णांना ब्राह्मण्य कसं प्राप्त होईल हे सर्व मला सांगा!’’

उमेच्या या प्रश्नावरून कोणत्याही वर्णाला वर्णपरिवर्तन करता येत होतं. याचा अर्थ शूद्राला ब्राह्मण होता येत होतं ही गोष्ट उघड होते.

हे वर्णपरिवर्तन कसं काय शक्य होतं, या प्रक्रियेचं उत्तर देताना महेश म्हणाले, ‘‘स्वत: ब्रह्मदेवानंच सांगितलं आहे की, शुद्धकर्मांनी शुद्ध मनाचा जितेंद्रिय शूद्रही ब्राह्मणाप्रमाणेच सेवा करण्यास योग्य आहे. गोड स्वभाव

आणि शुद्ध कर्म हे गुण जर शूद्रामध्ये असतील तर तो शूद्र ब्राह्मणापेक्षाही श्रेष्ठ समजावा असं माझं मत आहे. जन्म, संस्कार, विद्या, संतती हीच काही ब्राह्मणत्वाची कारणं नसून सद्वर्तन हेच ब्राह्मणत्वाचं मुख्य कारण होय. सद्वर्तनामुळे ब्राह्मणाला या जगात ब्राह्मणत्व प्राप्त झालं असून सद्वर्तननिष्ठ शूद्रही ब्राह्मणत्वाला जाऊन पोचतो. सर्वत्र समबुद्धी हाच ब्राह्मणाचा स्वभाव आहे. जन्मानं जे चार वर्ण केले आहेत, ते केवळ व्यवहारातील स्थानविभाग दर्शविण्यासाठीच आहेत असं प्रत्यक्ष ब्रह्मदेवानंच सृष्टी उत्पन्न करताना म्हटलं आहे.''

कनिष्ठवर्णीयांना उच्चवर्णीयांत आपल्या वर्तनाच्या बलावर सहज प्रवेश करता येतो ही गोष्ट शिवपार्वतीच्या या कथेवरून स्पष्ट होते.

एवढं निवेदन केल्यानंतर विठ्ठलपंत म्हणाले, ''चातुर्वर्ण्याचा निर्माता श्रीकृष्ण होता ही प्रचलित झालेली समजूत चुकीची आहे ना? शिवाय केवळ व्यावहारिक दृष्टिकोनातून श्रीकृष्णानं चातुर्वर्ण्याकडे बघितलेलं आहे. या चातुर्वर्ण्यातून जाती-पोटजाती निर्माण केल्या त्या माणसानं! आणि माणसानं केलेला हा अपराध आपण खुशाल श्रीकृष्णावर लादतो!''

काही वेळ थांबून विठ्ठलपंत जणू स्वत:च्याच मनाशी पुटपुटले, 'चातुर्वर्ण्यातून निर्माण झालेला हा जातिभेद आणि शिवाशिव मोडून टाकणारा युगपुरुष आता जन्माला यायला हवा!''

ते ऐकून गणेशा म्हणाला, ''येईल असा पुरुष तुमच्याच कुळात!''

विठ्ठलपंत अभावितपणानं उद्गारले, ''येईलही! प्रत्येकाला असंच वाटतं! मी नाही कशाला म्हणू? शेवटी ही परमेश्वरी योजनाच असते!''

त्यांचा निरोप घेताना गणेशा म्हणाला, ''आज आहे कोजागिरी पौर्णिमा. मी रात्री दूध घेऊन येतो.''

''नको... नको. मी दूध घेऊन ठेवलेलं आहे.''

रात्रीच्या वेळी विठ्ठलपंत मंदिराच्या पायरीवर येऊन बसले. जवळच दुधाचं भांडं होतं. देवळातली वर्दळ थंडावली होती. कोजागिरीचं पूर्णाकृती चंद्रबिंब जेव्हा माथ्यावर आलं, तेव्हा चंद्रामृत त्या दुग्धपात्रात सांडत होतं. धरणीवर अमृतवर्षाव होत होता.

एकदम कावळ्यांची कावकाव कानावर आली. तो शीतस्वरूपी चंद्रप्रकाश पहाटेचा समजून कावळे ओरडायला लागले तेव्हा विठ्ठलपंतांना घरची आठवण झाली. क्षणभर ते काहीसे अस्वस्थ झाले. यात्रा केल्या तरी गृहबंध असे

एकाएकी ढिले थोडेच पडतात?

घरची कोजागिरी त्यांना आठवली. कोजागिरी पौर्णिमेला चंद्र माथ्यावर आला आणि कावळे ओरडू लागले म्हणजे त्यांची आई म्हणायची, ''बघ... ऐक त्या कावळ्याचं ओरडणं! आता कोणते पाहुणे घरी येणार आहेत ते सांगताहेत!''

त्यांचे वडील या बोलण्याला पुस्ती जोडायचे, ''केवळ ते कावळे पाहुणे येण्याचीच वर्दी देतात असं नाही तर एखादी सुवार्ताही ते घेऊन येतात बरं का!''

त्या वेळी विठ्ठलपंतांना वाटायचं, 'कोजागर्ती' असं म्हणत या रात्री लक्ष्मी घरभर संचार करते. जे सदैव जागृत असतात, त्यांच्याच घरी सुखसमृद्धी नांदत असते. हे कावळे आपल्याला हाच संदेश देतात म्हणूनच आपण या कावळ्यांना शेवटी पिंडदान करतो आणि सद्‌गती प्राप्त करून घेतो!

विठ्ठलपंतांनी हा विचार एकदम मनावेगळा केला. त्यांना वाटलं, आपल्या जीवनाला अजून प्रारंभही झालेला नाही. आपण शेवटाचा विचार प्रारंभीच कशाला करायचा!

विठ्ठलपंतांनी विचार मनावेगळा केला आणि शेजारी ठेवलेलं अमृतमय दुग्ध प्राशन केलं.

इंद्रायणी संथगतीनं वाहतच होती. कोजागिरी पौर्णिमेचा पूर्ण चंद्रमाही गतिमान झाला होता. सारं सृष्टिजातच गतिमान झालेलं दिसत होतं. लक्ष्मीच्या संदेशाप्रमाणे जागरूकतेनं कार्यप्रवण झालेलं भासत होतं.

बदल हा सृष्टीचा धर्म आहे हा संदेशच त्या वेळी साकार झालेला भासत होता. कालचं आज राहत नाही. आजचं उद्या दिसत नाही. विश्वाचं हे रहाटगाडगं अनादिकालापासून चालत आलेलं आहे आणि अनंत कालापर्यंत चालणार आहे.

विठ्ठलपंतांच्या मनाच्या गाभाऱ्यातून उद्‌गार उमटत होता, ''मग आजचं चातुर्वर्ण्य आणि जातिभेद उद्या उरणार आहेत थोडेच?''


या विचारानं विठ्ठलपंतांना त्या उत्तररात्री केव्हा शांत निद्रा लागली, हे त्यांनाही कळलं नाही.

◆

## नवीन सुधारित आवृत्ती...

# बंद दरवाजा

**लक्ष्मण माने**





भटक्या-विमुक्तांच्या भळभळत्या जखमांचं
आणि त्यासाठी उभारलेल्या चळवळींचं
अभ्यासपूर्ण विश्लेषण

**किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# भटक्याचं भारूड

**लक्ष्मण माने**




भटक्या-विमुक्तांच्या शोषणावर, वर्णव्यवस्थेवर,
सरकारच्या अनास्थेवर परखड भाष्य करणाऱ्या
भाषणांचा संग्रह

**किंमत : २७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

अ

भि

प्रा

य

## प्रांजळ आत्मकथन

प्रत्येक अडचणीवर मात करत 'डॅम इट' म्हणून 'थरथराट' उडवणारे अभिनेते महेश कोठारे यांना आपण पडद्यावर पाहिलंच असेल. असेच अनुभव त्यांनी 'डॅम इट आणि बरंच काही' या आत्मचरित्रात मांडले आहेत. हे पुस्तक वाचताना रसिक त्यात बुडून जातात. खरंतर ही किमया साधली आहे शब्दांकन करताना मंदार जोशी यांनी. त्यांनी कोठारे नावाचं एक प्रयोगशील, धाडसी आणि त्याच वेळी खट्याळ, बिनधास्त असं व्यक्तिमत्त्व या पुस्तकातून आपल्यासमोर उभं राहतं. काहीही हातचं न राखता कोठारे त्यांनी त्यांच्या खास शैलीत कथन केलं आहे. त्यांनी सांगितलेले एकेक किस्से, त्यांची खास निरीक्षणं, वेगवेगळ्या गोष्टींवर व्यक्त केलेले विचार, त्यांनी केलेले प्रयोग, धाडस यांचं वर्णन या सगळ्या गोष्टी वाचून आपल्यासमोर काळाचा मोठा पटच उभा राहतो. नैतिक मूल्यांशी तडजोड न करणं, स्वाभिमान गहाण न ठेवणं, आपल्या निर्णयाशी तडजोड न करणं, ही स्वभाववैशिष्ट्यं त्यांनी अडचणीच्या काळातही जपली. त्याचं प्रतिबिंब पुस्तकात उमटलं आहे.

आई-वडिलांनी केलेले संस्कार, त्यांच्यामुळे लागलेली वाचनाची गोडी, शाळेतली मस्ती, बेस्टचा प्रवास, सण-उत्सवांमध्ये केलेली धमाल... अशा सर्व गोष्टींना कोठारे उजाळा देतात. आई-वडील नाटकांमध्ये काम करत असल्यामुळे त्यांना अभिनयाची गोडी लागली अन् 'छोटा 'जवान' या चित्रपटाने कलाक्षेत्रात ओळख मिळवून दिली. 'मेरे लाल', 'छोटा भाई' या चित्रपटांच्या आठवणी सांगताना सुलोचनादीदी, नूतन, आशा काळे अशा कलाकारांविषयीही ते त्यांच्या भावना व्यक्त करतात. 'उपकार'च्या






निर्मितीसाठी मनोजकुमार यांनी घेतलेले कष्ट पाहून आपणही भविष्यात अभिनय, निर्मिती आणि दिग्दर्शन अशी तिहेरी भूमिका साकारण्याची त्यांची इच्छा भविष्यात खरी ठरली.

तरुणपणी अभिनय करतानाच त्यांची वकिलीही सुरू होती. त्याचदरम्यान नीलिमा देसाई यांच्याशी लग्न कसं झालं, याचा किस्सा 'नजरे मिली दिल धडका' या भागात सांगितला आहे. 'लेक चालली सासरला' हा चित्रपट त्यांच्या कारकीर्दीमधला टर्निंग पॉइंट ठरला. इथून पुढं त्यांच्या यशाचा धूमधडाका सुरू झाला. 'प्यार किये जा' चित्रपट पाहत असतानाच त्यांना 'धूमधडाका'चं कास्टिंग सुचलं. हा चित्रपट करताना आलेले अनुभव त्यांनी उत्तमरीतीने मांडले आहेत. या चित्रपटाच्या रौप्यमहोत्सवी यशानंतर त्यांनी वकिलांला कसा रामराम ठोकला याचा पुस्तकात उल्लेख आहे.

'दे दणादण' हा चित्रपट २५ दिवसांमध्ये कसा पूर्ण केला, त्यासाठी लक्ष्मीकांत बेर्डे यांना चित्रपटात कसं घेतलं, पुढे 'थरथराट'ची निर्मिती स्वतःच्या बॅनरखाली करून टकलू नही हैवान या व्यक्तिरेखेसाठी राहुल सोलापूरकर यांची निवड कशी केली अशा गोष्टी कोठारे रंजकपणे मांडत जातात. मराठीतील पहिला सिनेमास्कोप चित्रपट करण्याचं वेड 'धडाकेबाज'द्वारे पूर्ण करण्यात आलेलं यश, बाटलीतील गंगारामचे प्रसंग चित्रित करण्यासाठी मराठीत पहिल्यांदाच 'ब्लू कर्टन'चा केलेला वापर आदी गोष्टींचा उलगडा आत्मचरित्रात केला आहे. 'झपाटलेला' चित्रपटासाठी रामदास पाध्ये यांनी बनवलेला तब्बल ९९ वा बाहुला त्यांना आवडला. अशीही आठवण ते सांगतात. 'माझा छकुला' हा चित्रपट आदिनाथच्या सुट्टीमध्ये केला. या चित्रपटाला व्यावसायिक अपयश आलं असलं, तरी महेशजी खचले नाहीत. त्यांनी 'मासूम' हा चित्रपट हिंदीमध्ये केला. त्याला मोठं यश मिळालं. त्यामुळे त्यांनी 'लो मै आ गया' हा चित्रपट केला; मात्र तो पूर्णतः फसल्याचंही फसल्याचंही ते मोकळेपणाने सांगतात. 'धांगडधिंगा', 'खतरनाक', 'चिमणी पाखरं', 'पछाडलेला', 'खबरदार', 'शुभमंगल सावधान', 'जबरदस्त' अशा अनेक 'आयकॉनिक' चित्रपटांच्या पडद्यामागच्या कितीतरी कहाण्या महेश कोठारे उलगडतात. अशोक सराफ,

सचिन पिळगांवकर आणि महेशजी यांना एकत्र आणणारा ‘आयड्याची कल्पना’ या चित्रपटापासून मराठीतील पहिला थ्री-डी चित्रपट ‘झपाटलेला-टू’ पर्यंत अनेक चित्रपटांशी संबंधित किश्श्यांचा पुस्तकात खजिनाच आहे.

लक्ष्मीकांत बेर्डे आणि महेश कोठारे यांची मैत्री किती घट्ट होती, याची प्रचिती पुस्तकातील अनेक पानांतून येते. ‘खांद्यावरील लक्ष्मीकांतचा हात हा माझ्यासाठी भक्कम आधार होता. हयात असेपर्यंत तो माझ्या प्रतयेक कलाकृतीचा एक अविभाज्य घटक होता,’ असं कोठारे यांनी नमूद केलं आहे. लक्ष्या हे जग सोडून गेला, तेव्हाची कोठारे यांची वाटचाल आणि त्यांच्यावरील संकटांची मालिका यांच्याविषयीही त्यांनी लिहिलं आहे.

भरपूर यश बघितलेले कोठारे यांना एकेकाळी डोक्यावरील कर्ज फेडण्यासाठी दादरचं घर विकण्याचीही वेळ आली होती. चित्रपटनिर्मितीत भरपूर कष्ट घेऊनही यश मिळत नसल्याने त्यांनी शेवटी टीव्ही मालिका निर्मितीत येण्याचा निर्णय घेतला आणि इथून त्यांचा ‘बॅड पॅच’ संपण्याचा प्रवास सुरू झाला. याला निमित्त ठरली त्यांची पत्नी. मराठी मालिकांमध्ये पाऊल ठेवल्यानंतर ‘जय मल्हार’ मालिकेचं प्रक्षेपण तब्बल तीन वर्ष चाललं. ही मालिका मराठी टीव्ही विश्वात गेमचेंजर ठरली. ‘गणपती बाप्पा मोरया’साठी वापरलेलं सीजी तंत्रज्ञान, ‘विठू माउली’ला अचानक वाढू लागलेल्या टीआरपीमुळे मिळालेलं बळ, कोल्हापुरातील बंद पडलेल्या चित्रनगरीत चित्रीकरण करून तिथल्या व्यवसायाला चालना देणाऱ्या ‘जोतिबा’ मालिकेविषयीही कोठारे पुस्तकात लिहितात.

बालकलाकार, नायक, खलनायक, लेखक, निर्माता, दिग्दर्शक आणि वितरक अशा वेगवेगळ्या भूमिका त्यांनी निभावल्या असल्या, तरी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहण्याची त्यांची इच्छा आहे. जीवनप्रवासात त्यांना साथ दिली ती त्यांचे ‘डॅडी’, आई जेनमा आणि पत्नी नीलिमा यांनी. मुलगा आदिनाथ, सून ऊर्मिला आणि आता त्यांचा जीव की प्राण बनलेली नात जिजा यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला आहे. समर्पक छायाचित्रांमुळे पुस्तक आणखो उठावदार झालं आहे.

**– अरुण सुर्वे (दै. सकाळ)**

२६.३.२०२३

## अरुणाची गोष्ट.....



अरुणा शानबाग ही एक कारवार (कर्नाटक) भागातील तरुणी इतरांसारखीच अनेक स्वप्ने उराशी बाळगून मुंबई सारख्या शहरात प्रवेश करते तो काळ १९७०चा. के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये नर्सिंगची परीक्षा देऊन तिची पुढील वाटचाल सुरू होते. अल्पावधीतच तिचा चुणचुणीत स्वभाव, कामातील कौशल्य आणि कामावरील निष्ठा या गुणांमुळे सर्व नर्सेस, पेशन्ट आणि डॉक्टर सर्वांमध्येच ती एक अत्यंत लाडके व्यक्तिमत्त्व होऊन जाते. के.ई.एम.मधीलच तरुण डॉक्टर सरदेसाई यांच्यासोबत तिचा विवाह ठरलेला असतो आणि भावी आयुष्याची गोड स्वप्ने अरुणा रंगवत असतानाच काळ घात करतो आणि तिच्या बाबतीत एक अत्यंत दुर्दैवी घटना घडते. २७ नोव्हेंबर, १९७३ या दिवशी सोहनलाल नावाचा वॉर्डबॉय कामावरील वाद डोक्यात ठेवून अरुणाच्या गळ्यात लोखंडी साखळी बांधून हॉस्पिटलच्याच तळघरात तिच्यावर निर्दयीपणे बलात्कार करतो. इतकेच नाही तर तिला प्रचंड मारहाण करून रक्तलांच्छित अवस्थेत तिला तिकडेच टाकून पळून जातो.

दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलमधील स्टाफला अरुणा रक्ताच्या थारोळ्यात मरणासन्न अवस्थेत सापडते. तिची तपासणी केल्यावर समजते की तिला अनेक ठिकाणी फ्रॅक्चर आहेत आणि मूळ इजा म्हणजे तिच्या मेंदूवर प्रचंड आघात होऊन ती कोमामध्ये गेली आहे. इथूनच सुरू होतो अरुणाचा मरणाकडे प्रवास...

मुंबईत अनेक स्वप्ने घेऊन आलेल्या एका हरहुन्नरी तरुणीची ही सत्यकथा वाचताना मन अक्षरशः हेलावून जाते. खुनाचा प्रयत्न केल्याबद्दल आरोपी सोहनलाल याला सात वर्षांची नाममात्र शिक्षा होऊन तो पुन्हा पूर्ववत आयुष्य जगायला लागतो; परंतु अरुणाचा जीवन-मृत्यूचा संघर्ष मात्र अखंड ४२ वर्षं चालूच राहतो. तिच्या अशा अवस्थेत तिचे कुठलेही नातेवाईक तिला स्वीकारायला तयार होत नाहीत तेव्हा के.ई.एम. मधील नर्स संपूर्ण सिस्टीमच्या विरोधात जाऊन, वेळ पडल्यास संप करून अरुणाचा सांभाळ दवाखान्यातच करण्याचा

धाडसी निर्णय घेतात आणि प्रशासनाला झुकावं लागतं.

पिंकी विराणी यांचं हे सत्य घटनेवर आधारित पुस्तक अनेक प्रश्नांना वाचा फोडतं, अनेक अनुत्तरित प्रश्न समोर आणतं. १९७३मध्ये घडलेली ही घटना आणि आजच्या काळात निर्भयासारख्या, श्रद्धा वालकरसारख्या घटना घडतात तेव्हा खरंच अस्वस्थ व्हायला होतं, असाहाय्य वाटायला लागतं.

'I want an end to this miserable life' असं देखील सांगण्याच्या अवस्थेत नसणाऱ्या अरुणा शानबागची ही जगावेगळी सत्यकथा...

**– संतोष रंगापुरे**

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# अंतर्नाद | रमेश जोशी




बाजीरावने ऐकला 'अंतर्नाद', त्यामुळे त्याला दिसलं 'आकाश'... महादेवसारख्या सद्वर्तनी व्यक्तीने घातलं एका जालीम गुन्हेगाराला जेवायला...एका आजोबांनी 'धर्म' या विषयावर साधला अतिरेक्यांशी संवाद... तर जीवनाबद्दल निराश झालेल्या इंजिनिअर श्रीयशला युद्धामुळे हानी झालेल्या गावातून मिळाली स्फूर्ती... सदानंदसारख्या कॉम्प्युटर तज्ज्ञाला निर्णयाची चतु:सूत्री कॉम्प्युटरला फीड केल्यानंतर मिळाले आश्चर्यकारक रिझल्ट्स...तर श्रीकांतसारख्या प्रामाणिक अधिकाऱ्याने जगदाळेसारख्या कामचुकार, राजकारणी सुपरवायझरवर उलटवला त्याचा डाव... तर अनेक माणसं, त्यांच्या अनेक समस्या...माणसाच्या मानसिकतेतून उद्भवलेल्या...माणसाने जर मूल्यं अंगी बाणवली, सद्विचारांची कास धरली, संयम राखला तर तो निश्चितच त्या समस्येवर मात करू शकतो, असाच काहीसा संदेश देणाऱ्या कथांचा हा संग्रह...सकारात्मकतेचं महत्त्व अधोरेखित करणारा...मानवी मनाची नकारात्मकता दर्शविणारा आणि त्याचा उताराही सांगणारा...

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


## नवी संहिता... नवा आशय...

TBC-32 Book No. 4

# धिस वॉज अ मॅन

**जेफ्री आर्चर**

अनुवाद
**लीना सोहोनी**





Master story teller जेफ्री आर्चर यांच्या 'द क्लिफ्टन क्रॉनिकल्स' या मालिकेचा सातवा भाग

**किंमत : १९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

TBC-32 Book No. 5

# द वॉन्टेड




**रॉबर्ट क्रेस** । अनुवाद : **सुरेश देशपांडे**

पौगंडावस्थेतल्या अल्लडपणातून घडलेल्या गुन्ह्यांचा शोध काढताना एल्विस कोल आणि ज्यो पाइकनं वापरलेल्या शोधतंत्राची रंजक कथा...

**किंमत : ४१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## १६ एप्रिल ते १५ मे २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१७ एप्रिल - शशिकांत वामन काळे यांचा जन्मदिन**

'मगरडोह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**१८ एप्रिल - मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन**

'हसाल तर वाचाल', 'खुलदाबादचा खजिना', 'नोबेल ललना भाग-१', 'नोबेल ललना भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५१०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१९ एप्रिल - पारू नाईक यांचा जन्मदिन**

'मी का नाही ?', 'मोहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१९ एप्रिल - जिन ली लेथम यांचा जन्मदिन**

'आगे बढो' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**२० एप्रिल - अजय पांडे यांचा जन्मदिन**

'रेझोनान्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२० एप्रिल - सेबॅस्टिअन फॉक्स यांचा जन्मदिन**

'डेव्हिल मे केअर' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२० एप्रिल - झियाउद्दीन युसफझाई यांचा जन्मदिन**

'लेट हर फ्लाय' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२१ एप्रिल - ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन**

‘तजेलदार कॅनव्हास’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग १’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग २’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग ३’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८६०/- । सवलत किंमत ५३९/-**

---

**२१ एप्रिल - मार्क ट्वेन यांचा जन्मदिन**

‘हकलबेरी फिनची साहसं’, ‘टॉम सॉयरची साहसं’, ‘मार्क ट्वेनच्या निवडक कथा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०१५/- । सवलत किंमत ६६०/-**

---

**२१ एप्रिल - ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन**

ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या तेरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३९४०/- । सवलत किंमत २३६४/-**

---

**२१ एप्रिल - डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांचा जन्मदिन**

‘करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३१०/- । सवलत किंमत २३३/-**

---

**२२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन**

‘फाइव्ह पॉइंट समवन’, ‘द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ’, ‘वन नाईट@ द कॉल सेंटर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७२०/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन**

बाळ फोंडके यांच्या सोळा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३६०५/- । सवलत किंमत २७४२/-**

---

**२३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन**

‘बंजाऱ्याचे घर’, ‘थर्ड पर्सन’, ‘अपूर्व, अलौकिक, एकमेव...’, ‘कमबख्त निंदर या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ६३०/-**

---

**२३ एप्रिल - जागतिक इंग्लिश भाषा दिन**

'EASY ENGLISH GRAMMAR AND COMPOSITION',
'A Methodical English Grammar', 'Fifty Essays' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७५५/- । सवलत किंमत ४६९/-**

**२४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन**

'चेस युअर ड्रीम्स', 'डेमोक्रसीज इलेव्हन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ५८०/-**

**२४ एप्रिल - कल्याणीरमण बेन्नूरवार यांचा जन्मदिन**

'अग्निदिव्य', 'तरंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४५/- । सवलत किंमत ४७९/-**

**२४ एप्रिल - विला कॅथर यांचा जन्मदिन**

'देवाची माणसे' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

**२८ एप्रिल - ए. जी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन**

'धीरुभाईझम', 'असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे', 'प्रतिकूलतेवर मात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३५५/- । सवलत किंमत २१३/-**

**२९ एप्रिल - राजा रवि वर्मा यांचा जन्मदिन**

'राजा रवि वर्मा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २१९/-**

**३० एप्रिल - अरुण शेवते यांचा जन्मदिन**

'चित्तचित्रे', 'मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी!', 'रंगल्या रात्री', 'रात्ररंग', 'साहेब संध्याकाळी भेटले...', 'स्वप्नी जे देखिले' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ६९९/-**

**३० एप्रिल - जॉन बायेन यांचा जन्मदिन**

'द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १मे ते १५ मे दरम्यान खास सवलत**

**४ मे - रॉबिन कुक यांचा जन्मदिन**
रॉबिन कुक यांच्या दहा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४१५/- । सवलत किंमत १७४९/-**

**४ मे - डॉ. एस. आर. देशपांडे यांचा जन्मदिन**
'भारतीय शिल्पवैभव', 'भारतीय गणिका', 'मराठेशाहीतील मनस्विनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३२९/-**

**७ मे - रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन**
रवींद्रनाथ टागोर लिखित सहा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८३०/- । सवलत किंमत ५९९/-**

**८ मे - ध्रुव भट्ट यांचा जन्मदिन**
ध्रुव भट्ट लिखित सात पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत १३२९/-**

**८ मे - द. ता. भोसले यांचा जन्मदिन**
'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ७९/-**

**११ मे - कल्पना कुलश्रेष्ठ यांचा जन्मदिन**
'इ.स.२५९५' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

**१२ मे - मदर्स डे**
**संच १ :** 'चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग १,२,३', 'चिकन सूप फॉर द सोल : इंडियन मदर्स', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'करुणाष्टक'
**संचाची मूळ किंमत १११५/- । सवलत किंमत ७०९/-**
**संच २ :** 'रुचिरा भाग-१ व भाग-२', 'जिच्या हाती पाळण्याची दोरी'..., 'गर्भसंस्कार', 'एक सांगू?'
**संचाची मूळ किंमत १२३०/- । सवलत किंमत ७८९/-**

**संच ३ :** ‘सुखद मातृत्व’, ‘सुखद बालसंगोपन’, ‘माय डॉटर माय मदर’, ‘माझ्या लाडक्या लेकींसाठी’

**संचाची मूळ किंमत ७७०/- । सवलत किंमत ४८९/-**

**संच ४ :** ‘कळेल का ‘त्याला’ आईचं मन?’, ‘माझ्या अम्मीची गोष्ट’, ‘एका मातेचा लढा’, ‘कुंती’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०८०/- । सवलत किंमत १३५२/-**

---

**१२ मे - डॉ. सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

‘चाळिशीनंतरची वाटचाल’, ‘वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन’, ‘व्याधिमुक्त’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ५७९/-**

---

**१२ मे - सुप्रिया वकील यांचा जन्मदिन**

‘हाऊज दॅट!’, ‘पॉपकॉर्न’, ‘उत्सव’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २७९/-**

---

**१३ मे - आर. के. नारायण यांचा जन्मदिन**

‘हलवाई’, ‘वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३८५/-**

---

**१३ मे - डॅफने द्यू मोरियेर यांचा जन्मदिन**

‘जमेका इन’, ‘माय कझिन रेशेल’, या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१४ मे - संभाजी महाराज जयंती**

‘संभाजी’, ‘छ. संभाजी : एक चिकित्सा’, ‘छावा’ (नाटक) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९४५/- । सवलत किंमत ६६२/-**

◆

**जागतिक कीर्तीचे लोकप्रिय लेखक जेफ्री आर्चर यांच्या छोट्या वाचकांसाठी रंगतदार कथा...**




किंमत : ₹४५०

ebook available

# जेफ्री आर्चर

## बाय रॉयल अपॉइन्टमेन्ट

## विली आणि खुनी किपर


## विलीची चौकोनी जगाची सफर

चित्रांकन
प्रिया कुरियन, अनुपमा अजिंक्य आपटे

अनुवाद
लीना सोहोनी




**गोष्टी छोट्या छोट्या छान...**
**गोष्टींच्या शेवटी संकल्प नीतिमान...**
**चित्रं आहेत सुंदर, देखणी...कुमारांसाठी अनोखी पर्वणी**










लेखक : **ज्ञानदा नाईक**

किंमत : प्रत्येकी ₹२९५

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/04/2023 Posting Date : 11/04/2023





**आवर्जून वाचावे...**


























**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,